नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५१ * अंक ६२ * * अमरावती * बुधवार, दिनांक ३ सप्टेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### जरांगे-देवेंद्र, दोन कंठमणी

आम्ही चार-पाच दिवसांपूर्वीच याच स्तंभात एक वाक्य लिहिले होते. तेव्हा आम्ही असे लिहिले होते की, त्यांचाही विजय आणि यांचाही विजय त्याप्रमाणेच आज तेही जिंकले आणि हेही जिंकले. त्यामुळेच आमचे शब्द आज अक्षरशः खरे ठरलेले आहेत. आज सायंकाळी जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळालेले आहे कारण गेले पाच दिवस मंत्रिमंडळाने आणि विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या बहुतेक सर्व मागण्या मान्य केलेल्या आहेत. ज्या गोष्टी अशक्य वाटत होत्या आणि हे आंदोलन चिघळत आहे असे काल सायंकाळपर्यंत वाटत होते, त्या आंदोलनाची सांगता आज अतिशय उत्तम प्रकारे विजयोत्सवामध्ये झाली हे खूप महत्त्वाचे आहे. मराठा समाजाच्या मागण्या आणि त्यासाठी जरांगे पाटील यांनी ज्या पद्धतीने सर्व सूत्रे हलवली आणि मग आपल्या समाज बांधवांना योग्य न्याय मिळवून दिला त्याबद्दल जरांगे पाटलांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच होईल. पण त्याचवेळी सरकार पक्षाने अत्यंत कौशल्याने कायदेशीररीत्या कुठलाही अडथळा येणार नाही असे अध्यादेश काढून मराठा समाज आणि त्यांच्या नेत्याला कुठल्याही प्रकारे अडचण येणार नाही, याचा कडेकोट बंदोबस्त केला. या सर्व गोष्टींच्या मागे मुख्यमंत्र्यांचे अति कौशल्य, गठीत केलेल्या उपसमितीचे मराठा समाजाच्या मागणीसाठी चे सकारात्मक धोरण आणि त्यासोबतच सरकार व आंदोलन यांच्यातील दुवा म्हणून उपसमितीने केलेली यथायोग्य शब्दावली याला आणि त्यांच्या कृतीला महाराष्ट्राची जनता धन्यवादच देईल. आंदोलन कोणतेही असो त्याला किती तापवावे आणि त्याला कुठे थांबवावे यादरम्यान आपल्या अनुयायांना कसे आवरावे याचे संपूर्ण नियोजन आंदोलक आणि त्यांचे नेते जरांगे पाटील यांनी ज्या पद्धतीने केले, त्याला कुठेच तोड नाही. ज्या जरांगे पाटलांना त्यांच्या तालुका आणि जिल्ह्याबाहेर कोणीही ओळखत नव्हते ते मराठा समाजाचे आता कंठमणी झालेले आहेत. गेल्या अनेक वर्षापासून भावनापूर्ण लढाई लढून आजचा सोन्याचा दिवस दाखवून मराठा समाजाला न्याय मिळवून त्यांनी दिला आहे त्याबद्दल भविष्यकाळात जरांगे पाटील या देव माणसाची आंदोलनाच्या इतिहासात नोंद केली जाईल. याबरोबरच महाराष्ट्र सरकारने हे प्रकरण ज्या पद्धतीने हाताळले तेही प्रशंसनीय आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुसऱ्या बाजू कडून कंठमणी ठरतात. कारण सरकारने जरांगे पाटील यांना मुंबईबाहेर का थांबवले नाही. खारघर मध्ये असलेल्या मैदानावर त्यांची व्यवस्था का केली नाही? असे प्रश्न अनेकांनी उपस्थित केले. पण खारघर पेक्षा गोडघर म्हणून आझाद मैदानाची नोंद करण्यासाठी सरकारने जरांगे पाटील यांना मुंबईत स्थान दिले असावे. माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी यांनी सर्व समाजासाठी काम करावयाचे आहे असे त्यांनी आज नागपुरात पत्रकारांशी बोलताना सांगितले. कधी कधी टीकेला धनी व्हावे लागते तर कधीकधीं फुलांचे हार गळ्यात पडतात. हे त्यांचे प्रतिपादन खूप बोलके आहे. सर्वांना जे मागेल ते देणारी मुंबापुरी या आंदोलनाच्या निमित्ताने सर्वांनाच पावली, सर्वांनाच भावली याबद्दल जरांगे पाटील यांचे आणि महाराष्ट्र सरकारचेही मनापासून अभिनंदन!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# संघर्षयोद्धा विजयी!



## मनोज जरांगेंनी उपोषण सोडले : महाराष्ट्र सरकारची शिष्टाई सफल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावरील उपोषण संपल्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने त्यांच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्या आहेत. त्यासंबंधीचे जीआरही सरकारने काढले आहे. त्यामुळे जरांगेंनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून लिंबू सरबत घेऊन आपले उपोषण सोडले. यामुळे गत शुक्रवारपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा तिढा यशस्वीपणे सुटला आहे.

मनोज जरांगे यांनी उपोषण सोडण्याची घोषणा केल्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांना लिंबू सरबत पाजले. त्यानंतर गणपतीची आरती करण्यात आली. यावेळी मराठा बांधवांनी व्यासपीठावर जरांगेंवर विजयाचा गुलाल उधळत आपला आनंद व्यक्त केला.

मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांनी आधी मसुदा दिला व त्यानंतर एक तासात जीआर देखील आला. यावेळी मनोज जरांगे यांनी व्यवस्थित पडताळून जीआर वाचले. तसेच वकिलांच्या मार्फत सुद्धा सगळे जीआर व्यवस्थित तपासून घेतले.



मनोज जरांगेंनी सलग ५ दिवस उपोषण केले. त्याचा फटका त्यांच्या प्रकृतीला बसला. आता उपोषण सोडल्यानंतर त्यांना जेजे रुग्णालयात हलवण्यात आले आहे. यासाठी एक विशेष रुग्णवाहिका आंदोलनस्थळी आझाद मैदानावर दाखल झाली होती.

मनोज जरांगे यांच्या उपोषणाच्या ५ व्या दिवशी सरकारने त्यांच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्यात. त्यामुळे मनोज जरांगे यांनी यासंबंधीचे सर्वच जीआर काढल्यानंतर मुंबई रात्री ९ वाजेपर्यंत मोकळी करण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार, सरकारकडून जीआर दिल्यानंतर मनोज जरांगेंनी उपोषण सोडले आहे.

मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज मराठा आरक्षणाचा अंतिम मसुदा घेऊन मनोज जरांगेंची भेट घेतली. त्यांनी जरांगे यांना तो मसुदा दाखवला. त्यानंतर जरांगेंनी तो वाचून दाखवला. तसेच आपण विचार करून कळवतो असे सांगितले. तसेच जीआर काढल्याशिवाय आपण इथून हलणार नाही असेही स्पष्ट केले.

**हैदराबाद गॅझेटियर लागू होणार**

त्यानंतर ते म्हणाले, आम्ही सरकारकडे हैदराबाद गॅझेटची तात्काळ अंमलबजावणी केली जावी अशी मागणी केली होती. विखे पाटलांनी तुम्हाला मान्य झाले तर तातडीने जीआर काढतो असे सांगितले आहे. आपण आपल्या अभ्यासकांकडे हे योग्य आहे का हे पाहायला देणार आहोत, नाहीतर पुन्हा वाशीसारखे होणार. हैदराबाद गॅझेटियर लागू करण्यास मंत्रिमंडळ उपसमिती मान्यता दिली आहे. यासंबंधीचा जीआर लवकरच काढला जाईल.

दुसरा कळीचा मुद्दा, ते देत नव्हते. सातारा गॅझेटियर पुणे व औंध यामध्ये अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. कायदेशीर बाबी तपासून त्या पद्धतीने निर्णय घेण्यात येईल असे यात म्हटले आहे.

मी त्यांना कारण विचारले, त्यावर त्यांनी औंध व साताऱ्यात काही कायदेशीर त्रुटी आहेत. शिवेंद्रराजे भोसले यांनी याची जबाबदारी घेतलेली आहे. ते १५ दिवस म्हणाले मी एक महिना दिला आहे. राजे बोलले म्हणजे विषय संपला, असे जरांगे यांनी सांगितले.

**गुन्हे सप्टेंबर अखेरपर्यंत मागे**

ते पुढे म्हणाले, राज्यात मराठा आंदोलकांवर झालेले गुन्हे तात्काळ मागे घेण्याची मागणी केली होती. त्यात काही गुन्हे मागे घेतले आहेत. काही गुन्हे कोर्टाच्या माध्यमातून मागे घेतले जाणार आहेत. यासाठी सरकारने सप्टेंबर अखेरची मुदत मागितली आहे. सरकार हाही जीआर काढणार आहे. राज्यपालांच्या सहीने लगेच जीआर काढणार आहेत, असे विखे पाटलांनी सांगितले आहे.

आम्ही सरकारकडे मराठा आंदोलनात बलिदान गेलेल्यांना तत्काळ आर्थिक मदत आणि कुटुंबाला नोकरी देण्याची मागणी केली होती. आतापर्यंत मयतांच्या कुटुंबाला १५ कोटी रुपये मदत देण्यात आली आहे. उर्वरित मदत लवकरच दिली जाईल. राज्य परिवाहन महामंडळात ही नोकरी दिली जाणार आहे.

यात बदल करून ज्याचे चांगले शिक्षण झाले असेल त्याला ड्रायव्हर बनविण्यापेक्षा त्याला दुसरे त्याच्या सक्षमतेचे काम दिले तरी चालेल. एमआयडीसी, एमएसईबी आदी ठिकाणी नोकरी द्या, असे जरांगेंनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना सांगितले.

दरम्यान, जरांगे यांचे उपोषण सुटल्याने आंदोलक गावाकडे परतू लागले आहेत.

## ओबीसी आरक्षणाला धक्का नाही

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :



मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर मराठा आरक्षणासंदर्भात सरकार आणि आंदोलकांमध्ये झालेल्या यशस्वी तोडग्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली.

सरकारने मराठा समाजाच्या हिताचा निर्णय घेतला आहे. हैदराबाद गॅझेट लागू करण्याची सरकारची सुरुवातीपासूनची तयारी होती. पण मनोज जरांगे यांची सरसकट आरक्षणाची मागणी कायद्याच्या कसोटीवर टिकणारी नव्हती. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता, 'सरसकट' आरक्षण देणे शक्य नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

फडणवीस म्हणाले, एक चांगला आणि मराठा समाजाच्या हिताचा तोडगा आज मंत्रिमंडळ उपसमितीने काढला. त्यामुळे चालू असलेले उपोषण संपवण्यात आलेले आहे. सरसकट करता येणार नाही, ते कायद्याच्या पातळीवर टिकणार नाही. जरांगेंच्या टीमने देखील काल ती भूमिका समजून घेतली आणि स्वीकारली. जीआर तयार झाला. त्यात जे काही बदल होते, ते आपण केले. इतरही काही अनुशंगिक मागण्या होत्या, त्या सगळ्या मागण्या मंत्रिमंडळ उपसमितीने मान्य केल्या आहेत.

आता ओबीसी समाजामध्ये भीती होती, सरसगट आरक्षण घेतील आणि इतर समाजही घुसण्याचा प्रयत्न करणार असे वाटत होते. आता तसे होणार नाही. जे मराठवाड्यात राहणारे, ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, रक्त-नात्यातील कुणाचाही कुणबी उल्लेख असेल तर त्याला कुणबी सर्टिफिकेट मिळणार. हैदरबाद गॅझेटच्या माध्यमातून, ज्यांना पुरावा मिळेल त्यांना आरक्षण मिळणार. ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का बसणार नाही असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## शपथेवर सांगितले होते आरक्षण देणार.. शिंदे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :



महायुती सरकारने मराठा समाजासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. त्यात आजचा निर्णय हा देखील मोठा असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मी याआधी जाहीर सभेत शिवरायांची शपथ घेऊन मराठा समाजाला आरक्षण देणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार एसईबीसीमधून दिले होते. ते टिकवले देखील, असेही शिंदे म्हणाले.

मी एकदा जाहीर सभेत छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन जाहीरपणे सांगितले होते की, मराठा समाजाला आरक्षण देणार. अखेर आज ते आरक्षण आम्ही दिल्याचे शिंदे म्हणाले.

## मनोज जरांगेंना अश्रू अनावर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :



संपूर्ण महाराष्ट्रासाठी विशेषतः मराठवाड्यासाठी आज सोन्याचा दिवस आहे. माज्या समाजाचे कल्याण झाले. हा माझ्या समाजासाठी सुवर्णक्षण असून आज दिवाळी साजरी करा, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मराठा आरक्षणासाठीचा शासन निर्णय आल्यानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. तसेच यावेळी मनोज जरांगे भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. मागच्या ७५ वर्षात विजय झाला नसेल असा विजय मराठ्यांचा झाला आहे, असे जरांगे यांनी म्हटले. यावेळी मराठा बांधवांनी 'पाटील.. पाटील' अशा घोषणाबाजी देखील दिल्या.

## सीएसएमटी फुल्ल!

■ मुंबई, दि. २ :

मनोज जरांगे यांचे उपोषण सुटल्यानंतर राज्याच्या विविध भागातून आलेले आंदोलक मंगळवारी गावाकडे परतू लागले. परिणामी, सीएसएमटीसह कुर्ला, दादर, कल्याण स्थानकावर आंदोलकांची तोबा गर्दी दिसून आली.

मुंबईतून सुटणाऱ्या रेल्वेत आरक्षण असूनही हजारो प्रवाशांना डब्यात शिरताच आले नाही. परिणामी, प्रवाशांची मोठीच गैरसोय झाल्याचे पाहायला मिळाले.

## टी-२० क्रिकेटमधून मिचेल स्टार्क निवृत्त

■ वृत्तसंस्था, सिडनी, दि. २ :



ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. ३५ वर्षीय स्टार्कने २०२६ च्या अखेरीस सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या व्यस्त कसोटी क्रिकेट वेळापत्रकाला आणि २०२७ मध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाला प्राधान्य देण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. स्टार्कने ६५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले, ज्यामध्ये त्याने ७९ विकेट्स घेतल्या.

## नागपूर मेट्रोच्या उड्डाणपुलाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :



कामठी मार्गावरील डबल डेकर व्हायाडक्ट हा मेट्रो व हायवे वाहतुकीसाठी ५.६३७ कि.मी. लांबीचा सिंगल कॉलम पिल्लरवर उभा असून हे स्थापत्य कलेचे अदभूत उदाहरण आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करुन बांधलेल्या या उड्डाणपुलाची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डतर्फे नोंद घेतली आहे.

रामगीरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष उपस्थितीत गिनिज वर्ल्ड रेकार्डचे भारतातील प्रतिनिधी स्वप्नील डोंगरीकर यांनी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना गिनिज वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र प्रमाणपत्र प्रदान केले.

यापूर्वी छत्रपतीनगर येथील ३.२ कि.मी. लांबीच्या डबल डक्ट उड्डाणपुलाची निर्मितीसाठी जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली होती. वास्तुकलेच्या या निर्मितीमुळे शहराला पायाभूत सुविधांचे शहर म्हणून नवीन ओळख मिळाली.

या पुरस्काराने नागपूरचा गौरव जागतिक स्तरापर्यंत पोहचला. या डबल डेकर पुलाच्या निर्मितीसोबतच कामठी मार्गावर रेल्वे, महामार्ग वाहतूक तसेच मेट्रो वाहतुकीसाठी जागात प्रथमच अशा प्रकारच्या उड्डाणपुल तयार करण्यात आला आहे. हे जगातील प्रमुख अभियांत्रिकीमधली आश्चर्य आहे, असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

यावेळी महामेट्रोचे संचालक अनिलकुमार कोकाटे, प्रकल्प संचालक राजीव त्यागी, कार्यकारी संचालक नरेश गुरबानी, महाव्यवस्थापक यीन राठोड, विद्यासागर व्यवस्थापक प्रविण मारोती, प्रकाश मुदलियार आदी अधिकारी तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

**नागपूरची नवीन ओळख**

महामेट्रोने अल्पावधीत जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचा विकास केल्यामुळे नागपूर या शहराला जागतिक ओळख मिळाली आहे. महामेट्रोने कामठी मार्गावरील सर्वात लांब डबल डेकर पुलाची निर्मिती केली असून या डबल डेकर पुलाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद घेतली आहे. जागतिक दर्जाच्या या पुरस्कारामुळे नागपूर हे जगातील उत्कृष्ट पायाभूत शहर म्हणून नवीन ओळख निर्माण झाली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## भूकंपातील मृतांची संख्या १४०० पार



■ वृत्तसंस्था, काबुल, दि. २ :

अफगाणिस्तानातील भूकंपात मृतांचा आकडा १४११ वर पोहोचला आहे, तर जखमींची संख्या ३२५० पेक्षा जास्त झाली आहे. तालिबानने ही माहिती दिली आहे.

रविवारी रात्री अफगाणिस्तानातील जलालाबादजवळ ६.० तीव्रतेचा भूकंप झाला. त्यावेळी बहुतेक लोक झोपले होते, त्यामुळे ते इमारतींच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारने जगभरातून मदत मागितली आहे. यानंतर, भारताने मदतीसाठी काबूलला १००० तंबू पाठवले आहेत. तसेच, १५ टन अन्नपदार्थ पाठवण्यात आले आहेत. भूकंपात शेकडो कुटुंबे उध्वस्त झाली आणि अनेक गावे उद्ध्वस्त झाली.

अफगाणिस्तानच्या आवाहनानंतर भारताव्यतिरिक्त चीन आणि ब्रिटनसारख्या देशांनीही मदत पाठवली आहे.

आपणा सर्वांची आस्था, प्रशिक ग्रामीण सहकारी पत संस्था..

प्रशिक ग्रामीण सह.पत संस्था मर्या.र.नं.७६०

डमी मत पत्रिका

विकास पॅनलचे संचालक पदाकरीता निवडणूक -२०२५ आरक्षणाची वर्गवारी

* मतदान दि.०७/०९/२०२५ * वेळ : सकाळी ८ ते सायं.४:०० वाजेपर्यंत.
स्थळ :- मुलजी जेठा नगर परिषद शाळा, टिळक चौक, कारंजा

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | चिन्ह | फुलीचा शिक्का |
| --- | --- | --- | --- |
| | सर्वसाधारण प्रवर्ग (मतपत्रिका पांढरा रंग) | गॅस सिलेंडर | |
| १) | ३. बंड आशिष माणिकलाल | | |
| २) | ४. भगत पांडूरंग मोतीराम | | |
| ३) | ६. कऱ्हे आकाश भास्करराव | | |
| ४) | ९. पाढेण ओंकार श्रीरामजी | | |
| ५) | १०.राऊत कृष्णा विठ्ठलराव | | |
| ६) | ११.साटोटे गुलाबराव चंपतराव | | |
| | महिला राखीव (मतपत्रिका गुलाबी रंग) | | |
| १) | ३. उकर्डे अनघा आनंद | | |
| २) | ४. उके सुनिता दिपक | | |
| | विमुक्त जाती/भटक्या जमाती (मतपत्रिका पिवळा रंग) | | |
| १) | १. जुमळे मेघन मधुकरराव | | |
| | अनुसुचित जाती/जमाती (मतपत्रिका निळसर रंग) | | |
| १) | २. रामटेके ॲड. रवि काशिनाथ | | |
| | इतर मागासवर्गीय (मतपत्रिका हिरवा रंग) | | |
| १) | १. काळे प्रशांत नारायण | | |

यांच्या गॅस सिलेंडर या निशाणीपुढे फुलीचा शिक्का मारुन यांनाच बहुमताने विजयी करा.

# लोकशाहीत आंदोलकांवर दबाव नको

## जरांगे पाटलांना आमचा ठाम पाठिंबा : इम्तियाज जलील



**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांना मैदान रिकामे करण्याची नोटीस मुंबई पोलिसांनी दिली असतानाच, एमआयएमचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि खासदार इम्तियाज जलील यांनी त्यांना ठाम पाठिंबा जाहीर केला आहे. जर पोलिसांनी बळजबरी केली, तर मुस्लीम समाज 'छातीचा कोट' बनून जरांगे पाटलांच्या पाठीशी उभा राहील, असा इशारा जलील यांनी दिला आहे. आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटलांची भेट घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना इम्तियाज जलील म्हणाले, मनोज जरांगे यांना एमआयएमचा पाठिंबा आहे. जर सरकार किंवा पोलिसांनी बळजबरी केली, तर मराठा समाज जितक्या ताकदीने रस्त्यावर उतरेल, तितक्याच ताकदीने मुस्लीम समाजही त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभा राहील. लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, असे सांगत जलील यांनी सरकारवर निशाणा साधला. हरियाणा, पंजाबमध्ये शेतकरी आंदोलन चाललं. शाहीनबागचे आंदोलनही महिनोंमहिने सुरू होते. मग महाराष्ट्रात मराठा समाजाच्या आंदोलनाची सरकारला एवढी भीती का वाटते?

# कांदिवली औद्योगिक वसाहतीतील गाळ्यांवर परवानगीविना ४३२ कोटींचे कर्ज

**मुंबई :** चारकोप येथील ६४ वर्षे जुन्या कांदिवली औद्योगिक वसाहतीतील भाडेपट्ट्यांच्या गाळ्यांचा बेकायदा व्यावसायिक वापर करताना मुंद्रांक शुल्क चोरी झाल्याची चौकशी सुरु असतानाच आता या गाळेधारकांनी उपनगर जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेता राष्ट्रीयकृत तसेच खासगी बँकांकडून परस्पर ४३२ कोटीचे कर्ज घेतल्याची बाब उघड झाली आहे. गाळे हस्तांतर, विक्री, गहाणखत, अनर्जित रक्कम आदींपोटी शासनाची परवानगी आवश्यक असतानाही मुद्रांक उपनिबंधकांनी हे व्यवहार नोंदणीकृत केल्याची गंभीर बाबही समोर आली आहे. यामुळे शासनाला कोट्यवधी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागले आहे. या प्रकरणी उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल मागविला आहे. ११६ एकरवर पसरलेल्या कांदिवली औद्योगिक वसाहतीत महसूल विभागाने १९६१ मध्ये दीडशे भूखंड भाडेपट्ट्याने दिले. या भूखंडाची विक्री वा हस्तांतरण जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय करता येत नाही. त्यापोटी आवश्यक ते शुल्क अदा करावे लागते. परंतु गहाणखत, विक्री, हस्तांतरण आदींपोटी १०४ व्यवहार उपनगर जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीविना झाल्याची बाब माहिती अधिकार कार्यकर्ते रेजी अब्राहम यांनी उघडकीस आणली आहे. यामध्ये अनेक गाळ्यांची विक्रीही झाली आहे. मात्र त्याची उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नोंद आढळत नाही.

# मराठा आंदोलकांना घुसखोर म्हणणे दुर्दैवी : संजय राऊत



**मुंबई :** मराठा आंदोलकांना दक्षिण मुंबईतून बाहेर काढण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावर उद्धव बाळासाहेब ठाकरे नेते, खासदार संजय राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मराठा आंदोलकांना 'घुसखोर' म्हटले जात असल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त करत आंदोलनासाठी ब्रेबॉर्न स्टेडियमची जागा देण्याची मागणी केली. संजय राऊत म्हणाले की, न्यायालयाचे म्हणणे योग्य आहे, की आंदोलन कायद्याच्या चौकटीत असावे. पण, हे सर्व मराठी बांधव महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये आले आहेत. ते घुसखोर किंवा उपरे नाहीत. त्यांनी अप्रत्यक्षपणे न्यायालयाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. गौतम अदानींसारखे अनेक लोक मुंबईत आहेत, ज्यांनी मराठी माणसाची धारावीच गिळली. त्यांना मुंबईबाहेर काढा असे न्यायालय का म्हणत नाही? पण आमच्या मराठी बांधवांना बाहेर काढण्यासाठी मात्र तात्काळ निर्णय झाला. संजय राऊत म्हणाले की, न्यायालयाचे म्हणणे योग्य आहे. पण हे सर्व मराठी बांधव असून ते महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये आले आहेत. ते घुसखोर नाही. ते उपरे आणि परप्रांतीय नाहीत. फक्त त्यांनी केवळ कायद्याच्या चौकटीत आंदोलन करावे.

# मेट्रो ४ मार्गिकेवरील अखेरच्या तुळईची यशस्वीपणे उभारणी



**मुंबई :** वडाळा घाटकोपर - कासारवडवली मेट्रो ४ मार्गिकेच्या कामातील सर्व प्री कास्ट घटक बसविण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडी) पूर्ण केले आहेत. मेट्रो ४ मार्गिकेवरील शेवटची तुळई नुकतीच यशस्वीरित्या बसविण्यात आली. हे काम पूर्ण झाल्याने मेट्रो ४ मार्गिकेसह कासारवडवली - गायमूख मेट्रो ४ मार्गिकेतील कॅडबरी जंक्शन - गायमूख या पहिल्या टप्प्याचे आतापर्यंत ८८ टक्के काम पूर्ण झाले आहे. येत्या १० ते १५ दिवसांत पहिल्या टप्प्यातील मार्गिकेवर मेट्रो गाड्यांची चाचणी सुरू करण्यात येणार आहे. तर डिसेंबरअखेरीस कॅडबरी जंक्शन - गायमूख टप्पा वाहतूक सेवेत दाखल होईल आणि ठाणेकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न पूर्ण होईल. एमएमआरडीएने मेट्रो ४ आणि मेट्रो ४ अ मार्गिकेचे काम हाती घेतले आहे. या मार्गिकांमधील कॅडबरी जंक्शन - गायमूख दरम्यानचा १०.५ किमी लांबीचाचा आणि १० मेट्रो स्थानकांचा समावेश असलेला पहिला टप्पा डिसेंबरअखेरीस वाहतूक सेवेत दाखल करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे.

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मार्च २०२६ पर्यंत अतिरिक्त २० विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :**

राज्यात विद्युत वाहनांचा वापर वाढविण्यासाठी विद्युत वाहनांना पथकर माफी देण्यात आली असून मुंबई-पुणे महामार्गावरही विद्युत वाहनांना पथकर माफी लागू झाली आहे. त्यामुळे आता या महामार्गावरुन धावणाऱ्या विद्युत वाहनांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. तेव्हा वाढत्या वाहनांना महामार्गावर चार्जिंगची सुविधा उपलब्ध करुन देणेही गरजेचे झाले आहे. सध्या महामार्गावर ५ चार्जिंग स्टेशन असून ती अपुरी असल्याने आता महामार्गावर २० चार्जिंग स्टेशन वाढविण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) घेतला आहे. त्यानुसार जागेचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण सुरु असून मार्च २०२६ पर्यंत नवीन २० चार्जिंग स्टेशन कार्यान्वित करण्याचे एमएसआरडीसीने नियोजन आहे.

वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी, हवामान बदल कमी करण्यासाठी तसेच खनिज तेलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी विद्युत वाहनांचा वापर वाढविण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. त्यासाठी विद्युत वाहन धोरण लागू करण्यात आले असून त्याअंतर्गत मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, अटल सेतू आणि नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर विद्युत वाहनांना १०० टक्के पथकर माफी १५ ऑगस्टपासून लागू करण्यात आली आहे. पथकर माफी लागू करतानाच धोरणात महामार्गावर विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन वाढविण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

त्यानुसार एमएसआरडीसीने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर २० अतिरिक्त चार्जिंग स्टेशन उभारण्याचा र्निणय घेतल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. सध्या महामार्गावर पाच विद्युत वाहने चार्जिंग स्टेशन आहेत. उर्से आणि खालापूर येथील पेट्रोल पंपावर डेल्टा, टाटा पॉवर, एक्सीकॉमसह अन्य एका कंपनीकडून चार्जिंग स्टेशन चालविली जात आहेत. विद्युत वाहनांना १५ ऑगस्टपासून विद्युत वाहनांना पथकर माफी दिल्याने भविष्यात विद्युत वाहनांची संख्या वाढणार आहे. पयार्याने महामार्गावरुन धावणाऱ्या विद्युत वाहनांच्या संख्येतही वाढ होणार आहे. वाढत्या वाहन संख्येला चार्जिंगसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे चार्जिंग स्टेशन वाढविण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

महामार्गावरील पुण्याच्या दिशेने आणि मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकांवरील पेट्रोल पंपांवर २० नवीन चार्जिंग स्टेशन सुरु करण्यात येणार आहेत. त्यासाठी जागेचा शोध सुरु आहे. जागा निश्चित करून लवकरच चार्जिंग स्टेशन उभी करण्यात येतील. खासगी कंपन्यांच्या माध्यमातून ती चालवली जाणार आहेत. तर मार्च २०२६ पर्यंत नवीन २० चार्जिंग स्टेशनवरील सुविधा सुरु करण्याचे नियोजन असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# न्यायालयाच्या आदेशानुसार मराठा आंदोलक नवी मुंबईकडे रवाना

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :**

मराठा आंदोलकांना छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस भागातून बाहेर काढण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार मुंबई पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली आहे. येथील मराठा आंदोलकांची समजूत काढली जात असून कोर्टाच्या आदेशानुसार कारवाई केली जात आहे. यावेळी गंगाधर काळकुटे पाटील यांनी देखील मराठा बांधवांना संबोधित केले असून कोर्टाच्या आदेशाचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

गंगाधर काळकुटे पाटील म्हणाले, आम्हाला कोणतेही एक ठिकाण द्या, वानखेडे असेल, आझाद मैदान असेल आम्ही तिथे थांबू. आंदोलन करण्याचा आमचा अधिकार आहे. आमचा मुंबईकरांना त्रास देण्याचा उद्देश नाही. काल रात्री कोटार्चा जो आदेश आला त्यानुसार मनोज जरांगे यांच्या शब्दाखातर सगळे मराठा आंदोलक नवी मुंबईला गेले आहेत. आमची ही विनंती आहे, आम्हाला पार्किंगची सुविधा द्या, शौचालयाची सुविधा करावी तसेच आम्हाला फाइन लावू नये, अशी विनंती काळकुटे पाटील यांनी केली आहे. इथले वातावरण आमच्या गावाकडच्या लोकांना माहीत नाही. पावसामुळे कपडे सुकत नाही, त्यामुळे कुठेतरी आमची राहण्याची सोय करावी. दरम्यान, मोठ्या प्रमाणात मराठा आंदोलक दक्षिण मुंबई तसेच इतर परिसरात जमले आहेत. याला न्यायालयाने आक्षेप घेत मुंबईमधून बाहेर जाण्याचे आदेश दिले आहेत. तसेच जे कोणी मराठा आंदोलक मुंबईच्या दिशेने येत आहेत त्यांना मुंबईत न येण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

# जामखेडमधील हल्ल्याच्या निषेधार्थ आठवले गटाचा मोर्चा



■ **महासागर प्रतिनिधी**
**अहिल्यानगर, दि. २ :**

रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या कुटुंबीयांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करत आरोपींवर मोक्काअंतर्गत कारवाई करावी व साळवे कुटुंबीयांना पोलीस संरक्षण द्यावे, या मागण्यांसाठी रिपब्लिकन पक्षाने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले. पोलीस तपासात हलगर्जीपणा झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

मोर्चात पक्षाचे पदाधिकारी विजय वाकचौरे, श्रीकांत भालेराव, किरण दाभाडे, अजयराव साळवे, सुरेंद्र थोरात, दीपकराव गायकवाड, अमित काळे, भीमा बागुल, लॉरेन्स स्वामी, अविनाश भोसले, राजू बडे, राजू जगताप, बाबा राजगुरू, आदिनाथ भोसले, विजय भांबळ, संजय कांबळे, ज्योती पवार, आरती बडेकर, युवराज गायकवाड, पप्पू बनसोडे, राजू नाना गायकवाड, सतीश मगर, धनंजय निकाळे, विजयराव खरात, कैलास कासार, अनिल नलावडे, विवेक भिंगारदिवे, विलास साळवे, सुरेश भागवत, प्रदीप लोखंडे, गौरव मगर, अमोल आहेर, राकेश गरुड, महेश अंगारखे आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

पोलिसांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, जामखेड तालुक्यातील नानज गावामध्ये गुंडांची टोळी कार्यरत असून, गावात दहशत निर्माण करणे, नागरिकांना मारहाण करणे, दुकानदार व वाहनचालकांकडून खंडणी उकळणे असे गुन्हे करत आहे. याच टोळीतील गुंडांनी दि. २९ जूनला अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केला. त्याच्या निषेधार्थ साळवे यांनी गाव बंद केले होते. याचाच राग मनात धरून साळवे यांच्या कुटुंबीयांवर तलवार, कोयते, लोखंडी रॉडसह जीवघेणा हल्ला करण्यात आला. यामध्ये यशदीप साळवे, रतन साळवे, आदेश साळवे, रेश्मा साळवे, दिग्विजय सोनवणे जखमी झाले आहेत.

अभिजित साळवे यांच्यावर शस्त्राने वार करून बेशुद्ध पडेपर्यंत मारहाण करण्यात आली. या प्रकरणातील आरोपींवर मोक्काअंतर्गत कारवाई करून घटनेच्या सूत्रधाराचा शोध घ्यावा, कटकारस्थानाचे कलम लावावे, खटला जलदगती न्यायालयात चालवावा, सर्व आरोपींना तत्काळ अटक करावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

# लग्नाळु मुलांना फसविणारी टोळी अटकेत

■ **महासागर प्रतिनिधी**
**धुळे, दि. २ :**

लग्न लावून देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांना गंडा घालणाऱ्या नागपूर येथील मध्यस्थ, नववधूसह चार जणांच्या टोळीस पोलिसांनी अटक केली. चौघाविरुद्ध चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात फसवणूकीच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झाला आहे.

सचिन मरगडे (रा.अंगझरी, नागपूर), काजल बारोट (२३, रा.शिरोही, राजस्थान), नेहा मेटकर (३३, रा.गांधीबाग. सीताबर्डी, नागपूर) आणि पूनम येती (३३, रा.शांतीनगर, नागपूर) अशी संशयितांची नावे आहेत. संशयित सचिन मरगडे हा मध्यस्थ (दलाल) तर नेहा मेटकर ही नववधू काजलची बहिण म्हणून आली होती. पूनम येती हिला लग्न लावून देण्यासाठी आणण्यात आले होते. पैकी काजलचे माहेरचे नाव काजल भलानी असे असून ती विवाहित आणि एका मुलाची आई असल्याचे कळते. यासंदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तुषार खैरनार (३५, रा.धुळे) याच्या विवाहासाठी वधू शोधणे सुरु होते. तुषारच्या आईला वधू शोधून देणाऱ्या नागपूर येथील व्यक्तीचा संपर्क क्रमांक मिळाला. वर आणि वधू दोन्ही बाजूंमध्ये २१ ऑगष्ट रोजी संपर्क झाल्यावर मध्यस्थी व्यक्ती, उपवर वधू आणि तिची बहिण असे तिघे तुषारच्या घरी आले. मुलीला बघण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर मध्यस्थाने लग्न लावून देण्यासाठी दीड लाख रुपयांची मागणी केली. यावेळी मध्यस्थ आणि नववधूच्या बहिणीसाठी तुषारच्या कुटुंबाने एक लाख ३० हजार रुपये रोख आणि काही रक्कम ऑनलाईन पदतीने दिली. यानंतर तुषारचा विवाह काजल या मुलीशी धुळ्यातील देवपूर येथील आदिशक्ती श्री एकविरादेवी मंदिरात लावून देण्यात आले.

# पाटणकर गटाचे १० गावांतील शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत दाखल



■ **महासागर प्रतिनिधी, कराड, दि. २ :**

खासदार शरद पवारांचे निकटचे सहकारी, राज्याचे माजी सार्वजनिक बांधकाममंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या धामणी, कवरवाडी, कुसवडे, झाकडे, बनपुरी, नाटोशी आदी १० गावांतील गटाला खिंडार पडले असून, शेकडो कार्यकर्ते पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीरपणे दाखल झाले आहेत. दौलतनगर-पाटण येथील शिवसेना पक्षप्रवेश कार्यक्रमात धामणी येथील रामनगर, लोकरेआळी, बादेवाडी व पुजारी मंडळ, कवरवाडी, चोरगेवाडी, शेंडेवाडी, दऱ्यातील मोरेवाडी, महिंद, बनपुरी, कुसवडे पुनर्वसन झाकडे, नाटोशी या १० गावांतील पाटणकर गटातील शेकडो कार्यकर्त्यांचे मंत्री शंभूराज देसाई यांनी शिवसेनेत स्वागत करत विकासकामांसाठी कटिबद्ध असल्याची ठाम ग्वाही त्यांना दिली. सत्तेतून आपण विविध विकासकामे मार्गी लावत असल्याने विरोधी गटातील कार्यकर्ते हे आज मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश करत आहेत.

# आकाश अग्रवाल या खाजगी सिएमआर गोदामाचा करारनामा रद्द करा

## देसाईगंज सिटिझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेची प्रधान सचिवांकडे मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २ :**

गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर मिलिंगच्या आड आकाश अग्रवाल गोडाऊन नैनपुर या शासनाने किरायाने घेतलेल्या गोडाऊन मधून वारंवार शासनाला सार्वजनिक वितरणा करीता मानवी खाण्यात अयोग्य तांदुळ पुरवठा करण्यात येत असल्याची गंभीर बाब लक्षात घेता आकाश अग्रवाल गोडाऊन नैनपुर या खाजगी गोडाऊनचा करारनामा रद्द करण्याची मागणी देसाईगंज सिटिझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या लेखी तक्रारीतुन केली असल्याने निकृष्ठ तांदळाचा पुरवठा करणाऱ्या राईसमिलर्सचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यात किमान आधारभूत खरेदी किंमत योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धानाची भरडाई करून त्यापासून तयार झालेला तांदुळ जमा करण्याकरिता जिल्ह्यात शासकीय गोडाऊन उपलब्ध असतांना व किरायाच्या गोडाऊनची आवश्यकता नसतांना सिएमआर मिलिंग करणाऱ्या राईसमिलर्सच्या कंपाऊंड मधिल त्यांच्या नातेवाईकांच्या नावे असलेले देसाईगंज (नैनपुर)येथील आकाश अग्रवाल गोडाऊन किरायाने घेतल्यामुळे शासनाच्या लाखो रुपयाचे नुकसान होत आहे.

नियमानुसार सिएमआर मिलिंग करणाऱ्या राईसमिलच्या कंपाऊंड मधिल गोडाऊन सिएमआर तांदूळ जमा करण्याकरिता घेता येत नाही.आकाश अग्रवाल गोडाऊनवर नियुक्त गुणनियंत्रण अधिकारी राईसमिलर्स सोबत संगनमत करून मानवी खाण्यास तांदूळ स्वीकृत करून कर्तव्यात हयगय करून शासनाची फसवणूक करीत आहेत.

नुकतेच देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधून दि.३० मे २०२५ रोजी मुलचेरा येथील शासकीय धान्य गोडाऊन मध्ये टीपी क्रमांक २१७०९९ तसेच अहेरी येथे टीपी क्रमांक ३४३३०१ व दि.२ जुन २०२५ रोजी शासकीय धान्य गोडाऊन अहेरी येथे टीपी क्रमांक २१७१०० तसेच दि.३१ जुलै २०२५ रोजी शासकीय धान्य गोडाऊन गडचिरोली,टीपी क्रमांक ३४३२४७ नुसार पाठविलेले तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आल्याने येथील संबंधित गोडाऊन व्यवस्थापकांनी आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज यांना तांदूळ बदलून मागण्यांसंदर्भात लेखी पत्र दिले.

दरम्यान गडचिरोली येथे दि.३१ जुलै २०२५ रोजी देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधून पाठविण्यात आलेला विशाल राईसमिल कुरुडचा तब्बल ४५० कट्टे मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आल्याने येथील गोडाऊन व्यवस्थापकांनी सदर तांदुळ जप्त करून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात पुढील कायदेशीर कारवाई करणे आवश्यक होते.

मात्र येथील गोडाऊन व्यवस्थापकाने असे न करता आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज व विशाल राईसमिल कुरुड यांना तांदूळ बदलून देण्याकरिता परस्पर पत्र देऊन कर्तव्यात कसूर केले. यावरून आकाश अग्रवाल गोडाऊनचे संचालक,संबंधित राईसमिलर्स व त्या गोडाऊनवर नियुक्त गुणनियंत्रण अधिकारी तसेच संबंधित गोडाऊन व्यवस्थापक हे संगनमताने शासनाची कोट्यावधी रुपयाने फसवणूक करीत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.ही गंभीर बाब लक्षात घेता आकाश अग्रवाल या खाजगी सिएमआर गोडाऊनचा करारनामा रद्द करण्यात यावा,अशी मागणी कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

# गणेशोत्सवात टोळक्याकडून वाहनांची तोडफोड

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २ :**

टोळक्याने वाहनांची तोडफोड करून दहशत माजविल्याची घटना लष्कर आणि औंध भागात घडली. या प्रकरणी पोलिसांकडून दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले. गणेशोत्सवात शहरात तोडफोडीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये घबराट उडाली आहे.

लष्कर भागातील पूना कॉलेजसमोरील गल्लीत वाहनांची तोडफोड करण्याची घटना ३० ऑगस्ट रोजी रात्री घडली. या प्रकरणी रुद्र शिंदे, प्रथमेश, यश खरारे (रा. हरकानगर, भवानी पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका महिलेने लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला लष्कर भागात राहायला आहेत.

चित्रगुप्त अपार्टमेंट परिसरातील वाहनांची तोडफोड करुन आरोपी पसार झाले. सहायक फौजदार बरडे तपास करत आहेत.औंध भागात टोळक्याने दहशत माजवून मोटारीसह दुचाकींची तोडफोड केल्याची घटना (१ सप्टेंबर) मध्यरात्री घडली. याबाबत एकाने चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. औंध भागातील टेरेसा रस्त्यावर लावलेली मोटार, दुचाकींची लाकडी दांडक्याने तोडफोड केल्याची घटना घडली. तोडफोड करुन टोळके पसार झाले.

# मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतले पुण्यातील मानाच्या गणपतींचे दर्शन



■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. २ :**

पुण्यातील मानाचे गणपती हे राज्यातील एक सन्मानाचा विषय आहे. राज्यशासनाने गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा दिला आहे. गणपतीने सर्वांना सुख, समाधान, आरोग्य, ऐश्वर्य द्यावे. सर्वांच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात. सर्वांना सुबुद्धी देवो, सन्मार्गाने चालण्याची प्रेरणा देवो, अशी प्रार्थना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री गणेशाकडे केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांना भेटी देऊन श्री गणेशाचे दर्शन घेतले आणि आरती केली. यावेळी फडणवीस यांचा विविध मंडळांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

त्यांनी कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालिम मंडळ, श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळ केसरीवाडा या मानाच्या गणपती मंडळांसह श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ, साई गणेश मित्रमंडळ, साने गुरुजी तरुण मंडळांना भेटी देऊन दर्शन घेतले. तत्पूर्वी त्यांनी अभिनेता नाना पाटेकर यांच्या डोणजे येथील निवासस्थानी भेट देऊन गणपतीचे दर्शन घेतले. याप्रसंगी पाटेकर यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत व सत्कार केला.

पुणे येथील गणेश मंडळांना भेटीप्रसंगी केंद्रीय सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार हेमंत रासने, कसबा गणपतीचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, तांबडी जोगेश्वरी गणपती मंडळाचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, गुरुजी तालीम मंडळाचे अध्यक्ष प्रवीण परदेशी, श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळाचे उत्सवप्रमुख डॉ. रोहित टिळक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदीराचे अध्यक्ष सुनील रासने, साने गुरुजी तरुण मंडळाचे अध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह विविध मंडळाचे विश्वस्त, पदाधिकारी उपस्थित होते.

# हृदयाच्या अनियमित ठोक्यांच्या उपचारात लिडलेस पेसमेकरची क्रांती

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ :**

आज आपण हाताच्या तळव्यात मावणाऱ्या छोट्या बॅटऱ्या अत्याधुनिक उपकरणांना ऊर्जा पुरवताना पाहतो. आता कल्पना करा याहूनही छोटं उपकरण मानवी हृदयाला नियमित ठोके द्यायला शक्ती देत आहे. ही पुढच्या पिढीची हृदयविषयक तंत्रज्ञानक्रांती म्हणजे लीडलेस पेसमेकर, जो हृदयाच्या अनियमित ठोक्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. हृदयाचे ठोके कधी खूप जलद, कधी खूप संथ किंवा अनियमित होतात, त्यालाच अनियमित हृदयस्पंदन म्हणतात. याकडे दुर्लक्ष झाल्यास रुग्णांना गंभीर गुंतागुंतींना सामोरे जावे लागू शकते, अगदी जीवाला धोका निर्माण होण्यापर्यंत. यातीलच एक सामान्य प्रकार म्हणजे ब्रॅडिकार्डिया, ज्यामध्ये हृदय इतके संथ ठोके देते की शरीराच्या गरजा पूर्ण होत नाहीत.

नवीनतम पिढीतील लीडलेस पेसमेकर हे विकार प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. हे पेसमेकर अतिशय लहान आकाराचे असून, अल्प-आक्रमक पद्धतीने बसवले जातात आणि गरज पडल्यास परत काढूनही घेता येतात.

पेसमेकर हे एक वैद्यकीय उपकरण आहे जे हृदयाचे ठोके नियमित ठेवायला मदत करते. पारंपरिक पेसमेकर साधारणपणे हनुवटीजवळ छातीच्या त्वचेखाली बसवले जातात आणि तारा (ज्यांना लीड्स म्हणतात) द्वारे हृदयाशी जोडलेले असतात. या तारांमधून हृदयाला विद्युत संदेश पाठवले जातात, ज्यामुळे हृदयाचे ठोके योग्य गतीने चालतात. यामुळे छातीत दुखणे, थकवा, धडधड किंवा अस्वस्थता अशा त्रासांपासून आराम मिळतो.

लीडलेस पेसमेकर असे विकसित केले गेले आहेत की डॉक्टरांसाठी त्यांची बसवणी आणि काढणी शक्य तितकी सोपी होईल, तसेच विद्यमान तंत्रज्ञानाच्या तुलनेत लक्षणीय सुधारणा मिळतील, असे भारत, आग्नेय आशिया, हाँगकाँग, तैवान आणि कोरिया येथील कार्डियाक रिदम मॅनेजमेंटचे जनरल मॅनेजर अजय सिंग चौहान यांनी सांगितले. हे रुग्णांसाठी खरंच जीवन बदलून टाकणारे ठरत असून, हृदयाच्या ठोक्यांच्या समस्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी नवी दालने उघडते आहे.

तंत्रज्ञानामुळे पेसमेकर आता आधीपेक्षा अधिक छोटे आणि आकर्षक झाले आहेत. त्याचबरोबर पारंपरिक प्रणालीतील मोठ्या अडचणींवरही तोडगा निघाला आहे, जसे की छातीत पाउच तयार करणे किंवा तारा वापरणे, जिथे संसर्ग होणे, तारा हलणे किंवा तुटणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

# जिल्ह्यात पुन्हा पावसाचा धडाका

**चांदूर बाजार तालुक्यात पुन्हा पावसाचा कहर | धारणी तालुक्यात बंधारा फुटला | अप्पर वर्धा धरण झाले फुल्ल**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 ) – मोजक्या दिवसाची सवड दिल्यानंतर पावसाने मंगळवारी पुन्हा एकदा आपला धडाका लावला, जिल्हयातील विविध तालुक्यात तुफान पाऊस बरसल्याने प्रचंड नुकसान झाले. चांदुर बाजार तालुक्यातील माधान येथे पुन्हा जोर्याचा पाऊस बरसल्याने गावात नाल्याचे पाणी शिरले, दुसरीकडे धारणी तालुक्यातील बारु येथे पाझर तलाव फुटल्याने शेकडो एकर शेती खरडून गेली, मोर्शी तालुक्यातील अप्पर वर्धा धरण फुल्ल झाल्याने नदीकाठावरिल गावांना अलर्ट करण्यात आले आहे.**

## चांदूर बाजार तालुक्यात पावसाचा कहर

**चांदूर बाजार** – गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे काल रात्री सुमारास अकराच्या वेळेत माधान गावावर पुराचे संकट ओढवले. अचानक आलेल्या पुराच्या पाण्याने गावात घुसखोरी करत घरे, झोपड्या, धान्य आणि शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. या घटनेमुळे गावकरी भयभीत झाले असून ते तातडीच्या मदतीसाठी प्रशासनाकडे आशेने पाहत आहेत.

**शेतपिकांचे मोठे नुकसान**

पूरामुळे गावातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतात उभे असलेले पिक पाण्याखाली गेले. विशेषत: सोयाबीन आणि कापूस या दोन मुख्य पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या मते, या हंगामावरच त्यांचे जगणे अवलंबून होते. त्यामुळे आता त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.





### कायमस्वरूपी उपाययोजना गरजेच्या

याआधी देखील अशाच घटनांनंतर प्रशासनाने घटनास्थळी पाहणी केली होती. मात्र अद्याप ठोस मदत किंवा निर्णय झालेला नाही. दरवर्षी पुराचा फटका बसूनही कायमस्वरूपी उपाययोजना न केल्यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.

### नेमकी मदत कधी मिळणार ?

असा आणि तसेच जबाबदार अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष मदत सुरू करावी, पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी एकमुखी मागणी केली आहे.


### माधान गाव पुन्हा तुंबले

### शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

### तातडीने पंचनामे व्हावे

पूर्वी जाहीर करण्यात आलेला सानुग्रह निधी अद्याप बहुतांश पूरग्रस्तांपर्यंत पोहोचलेला नाही. त्यामुळे हा निधी फक्त कागदावरच राहणार का, अशी शंका नागरिक व्यक्त करत आहेत.







## बारु येथील तलाव फुटल्याने लाखोंचे नुकसान

**■ढाकणा, अकोट मार्ग झाला ठप्प**
**■शेकडो एकर शेती गेली खरडून**

**धारणी**–धारणी तालुक्यातील बारु येथील पाझर तलाव फुटल्याने परिसरात प्रचंड नुकसान झाले आहे. शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान तर झालेच, पण शेतकऱ्यांची शेकडो एकर जमीन खरडून गेली असून शेतातील पिके पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत. या घटनेमुळे बारुङ्कढाकणा मार्ग बंद पडला असून धारणीङ्कअकोट मार्गावरील वाहतूक सकाळपासून ठप्प झाली. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

जिल्हा परिषद जलसंधारण उपविभाग धारणी अंतर्गत असलेला हा तलाव अतिवृष्टीमुळे अचानक फुटल्याने जलप्रलयासारखी परिस्थिती निर्माण झाली. तलावात टाकलेले लाखो रुपयांचे मत्स्यबीज वाहून गेले, तर अनेक शेतातील कापूस, सोयाबीन, मका यांसारखी पिके पाण्याखाली गेली. तलाव नादुरुस्त असून त्याकडे जलसंधारण विभागाने दुर्लक्ष केल्याने ही दुर्घटना घडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. भाजप नेते हिरालाल मावसकर यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, तहसीलदार प्रदीप शेवाळे आणि ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत नागरिकांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाकडून प्राथमिक पंचनामा सुरू असून नुकसानग्रस्तांना मदत मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. बारु परिसरातील नागरिक मात्र या घटनेला जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, तसेच भविष्यात अशी दुर्घटना टाळण्यासाठी नादुरुस्त तलावांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी करत आहेत.




**मोर्शी**– विदर्भातील प्रमुख जलस्त्रोत मानल्या जाणाऱ्या अप्पर वर्धा धरणाने यंदाच्या पावसाळ्यात क्षमतेच्या शिखराला गवसणी घातली आहे. मंगळवार, दि. 2 सप्टेंबर रोजी सकाळी 8.30 वाजता धरणाचे सर्व 13 पैकी 13 दरवाजे 55 सेंटीमीटरने उघडण्यात आले. परिणामी तब्बल 1151.51 घनमीटर प्रति सेकंद पाण्याचा तुफानी विसर्ग वर्धा नदीपात्रात सुरू झाला असून परिसरात पाहण्यासारखा विहंगम नजारा अनुभवायला मिळत आहे.

### टप्प्याटप्प्याने विसर्ग

28 ऑगस्ट : प्रथमच 7 दरवाजे 30 सेंमीने उघडून 377.47 घनमीटर/सेकंद पाणी सोडण्यात आले. 29 ऑगस्ट – 9 दरवाजे 40 सेंमीने उघडून 577 घनमीटर/सेकंद विसर्ग करण्यात आला. 2 सप्टेंबर – अखेर सर्व 13 दरवाजे उघडून तब्बल 1151.51 घनमीटर/सेकंद पाण्याचा विसर्ग सुरू झाला.

### धरणात 96 टक्के जलसाठा

सध्या धरणात 910 घनमीटर/सेकंद येवा होत आहे. मध्यप्रदेशातील जाम व सालबर्डी परिसरातून वाहणारी माडू नदी तुडुंब भरून वाहत असल्याने धरणाच्या जलसाठ्यात झपाट्याने वाढ झाली आहे. सकाळी 8 वाजेपर्यंत धरणाची पातळी 342.27 मीटर इतकी झाली असून ती निर्धारित मर्यादा (342.50 मी.) गाठण्याच्या उंबरठ्यावर आहे. त्यामुळे धरण 96.27 टक्के इतके भरले आहे.

### पर्यटकांचा उत्साह, धरणावर गर्दी

धरणाचे सर्व दरवाजे उघडल्याने निर्माण झालेला प्रचंड धबधबा, पाण्याचे तुषार आणि गडगडणारा आवाज हे आकर्षण ठरत असून पर्यटकांची मोठी गर्दी धरण परिसरात उसळली आहे. पाण्याच्या तुषारांत भिजण्याचा रोमांच अनुभवण्यासाठी नागरिक धरणाजवळ धाव घेत आहेत. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी मोर्शी पोलीस ठाण्याचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### वाहतुकीवर परिणामाची शक्यता

सध्या धरणाच्या पुलाखालून पाणी वाहत असून आष्टीङ्कतळेगावङ्कआर्वी मार्ग वाहतुकीस खुला आहे. मात्र धरण 100 टक्के भरल्यास पाणी पुलावरून वाहू शकते. अशा परिस्थितीत या मार्गावरील वाहतूक पूर्णत: बंद करण्याची शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे. अप्पर वर्धा धरणाचा तुफानी विसर्ग आणि विहंगम नजारा पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली असली तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

### पर्यटकांचा उत्साह, धरणावर गर्दी

धरणाचे सर्व दरवाजे उघडल्याने निर्माण झालेला प्रचंड धबधबा, पाण्याचे तुषार आणि गडगडणारा आवाज हे आकर्षण ठरत असून पर्यटकांची मोठी गर्दी धरण परिसरात उसळली आहे. पाण्याच्या तुषारांत भिजण्याचा रोमांच अनुभवण्यासाठी नागरिक धरणाजवळ धाव घेत आहेत. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी मोर्शी पोलीस ठाण्याचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# चार प्रहार कार्यकर्त्यांवर गुन्हे

**पत्रकार परिषदेत आमदारांवर केले होते आरोप**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, (दि. 2)** – अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्याविरोधात घेतलेल्या पत्रकार परिषदेत बनावट पत्र सादर केल्याप्रकरणी प्रहार पक्षाच्या चार कार्यकर्त्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर मतदारसंघातील दहा कोटी रुपयांचा निधी मोर्शी विधानसभा मतदारसंघात वर्ग केला, असा आरोप करणारे बनावट दस्तावेज प्रहार कार्यकर्त्यांनी अमरावती येथील श्रमिक पत्रकार भवनात 30 ऑगस्ट रोजी पत्रकार परिषदेत दाखवले. हे दस्तावेज प्रसार माध्यमं व समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारितही झाले होते.

या प्रकरणी रमेश तायवाडे (49, रा. शिरजगाव बंड) यांनी 30 ऑगस्ट रोजी चांदूरबाजार पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर 31 ऑगस्ट रोजी पहाटे ऋषिकेश श्रीवास, प्रदीप बंड, प्रसन्ना अढाव आणि सुरेश गणेशकर यांच्याविरुद्ध फसवणूक व बनावट दस्तावेज तयार करून तो खरा असल्याचे भासविल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला. पोलिसांनी तातडीने कारवाई करत गुन्हा दाखल केला. आमदार प्रवीण तायडे यांनी 30 ऑगस्ट रोजी अमरावतीत पत्रकार परिषद घेऊन निधीविषयी अधिकृत माहिती दिली होती. तर, त्याच दिवशी प्रहार पदाधिकाऱ्यांनी मंत्रालयातील बनावट शिक्का, लेटरहेड व स्कॅन केलेली स्वाक्षरी वापरून पत्र तयार केले व नागरिकांची दिशाभूल केली, असा आरोप फिर्यादीने केला आहे.

> आलेल्या तक्रारीवरून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.
> **अशोक जाधव, ठाणेदार, चांदूर बाजार.**

# ऑटोमोबाईल दुकानात 2.70 लाखांची चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि. 2 ) :** शहरातील गाडगेनगर परिसरात गणपती स्थापना करून घरी गेलेल्या व्यापाऱ्याच्या ऑटोमोबाईल दुकानात अज्ञात चोरट्यांनी हात साफ करत तब्बल 2 लाख 70 हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

फिर्यादी दिलीप रामचंद्र सभवानी (वय 42, रा. कृष्णानगर, गल्ली क्र. 5, अमरावती) यांचे गाडगेनगर भागात ऑटोमोबाईल दुकान आहे. 1 सप्टेंबर रोजी त्यांनी आपल्या दुकानात गणपतीची स्थापना करून पूजा केली आणि रात्री दुकान बंद करून घरी परतले. दुसऱ्या दिवशी (2 सप्टेंबर रोजी) सकाळी वडील व दुकानातील कामगारासोबत दुकान उघडले असता दुकानातील काउंटर अस्ताव्यस्त स्थितीत आढळले. संशय आल्याने खालच्या मजल्यावरील कॉटरमधील ड्रॉवर व लॉकरची पाहणी केली असता, तेथील 20 हजार रुपये व लॉकरमध्ये ठेवलेले 2 लाख 50 हजार रुपये असे मिळून एकूण 2 लाख 70 हजार रुपये गायब असल्याचे दिसून आले. ही घटना लक्षात आल्यानंतर फिर्यादींनी तत्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली. गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवला आहे. पोलिस उपनिरीक्षक आदित्य यांच्या पुढील तपास सुरू आहे. ही घटना गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर घडल्याने परिसरात चिंतेचे वातावरण आहे. पोलिसांनी चोरट्यांचा तातडीने शोध घेण्यास सुरुवात केली आहे.

## बांधकामस्थळावरून पडल्याने मजूराचा मृत्यू

**अमरावती :** साईनगर स्थित मधुसूदन कॉलनी स्थित गजानन महाराज मंदिराजवळील बांधकामस्थळावरून पडलेल्या एका मजूराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. शेरवान शामलाल धुर्वे (34, रा. तांगडा, ता. धारणी) असे मृताचे नाव आहे. ही घटना 2 सप्टेंबर रोजी सकाळी 6.35 वाजता उघडकीस आली. शेरवान धुर्वे हे साईनगरातील एका बांधकामस्थळी काम करीत असताना, खाली पडले. त्यांना तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी आणले गेले. परंतू त्यांचा सकाळी 7 वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या मृतदेहाला जिल्हा सामान्य रुग्णालयातील शवगाराला शवविच्छेदनाकरिता ठेवण्यात आले होते. या घटनेच्या माहितीवरून राजापेठ पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आणि पोलिसांनी पुढील कार्यवाही सुरु केली होती.

## दहीगाव रेचा येथे डोहात पाय घसरुन 17 वर्षीय युवकाचा मृत्यू

**अंजनगाव सुर्जी** – तालुक्यातील दहीगाव रेचा येथे कडू नाल्यात रविवारी (31 ऑगस्ट) संध्याकाळी सहा वाजता दुर्दैवी घटना घडली. पथ्रोट येथील रहिवासी मो. रिजवान मो. किस्मत (वय 17) हा युवक पाय घसरुन डोहात पडला आणि त्याचा बुडून मृत्यू झाला. घटनास्थळावर मिळालेल्या माहितीनुसार, दहीगाव येथे संत्रा तोडण्यासाठी मजूर आले होते. काम संपल्यानंतर रिजवान आपल्या दोन मित्रांसह शौचास गेला. त्यानंतर तिघेही वाहत असलेल्या कडुनाल्यात हातपाय धुण्यासाठी गेले. मात्र, शेवाळलेल्या दगडांवरून रिजवानचा तोल गेला आणि तो डोहात पडला. मित्रांनी त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला, परंतु निसरड्या दगडांमुळे त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. प्रचंड प्रवाहाने त्याला ओढून नेले.माहिती मिळताच तहसीलदार पुष्पा सोळंके, ठाणेदार सुरज बोंडे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. खोल डोह असल्याने तत्काळ शोधमोहीम राबवता आली नाही. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीला पाचारण करण्यात आले. दरम्यान, घटनास्थळी मृतकाच्या नातेवाईकांसह ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. शेवटी दुसऱ्या दिवशी, म्हणजेच 1 सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजता मृतकाचा मृतदेह पाण्यावर आला. अंजनगाव सुर्जी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.



अंजनगाव बारी - येथील शरद गाडेकर यांच्याकडील महालक्ष्मी दर्शन



अचलपूर -श्री नूतन गणेश मंडळ (अब्बासपुरा, कासारपुरा).



अचलपूर -बाल मित्र गणेश उत्सव मंडल लक्ष्मी नारायण मंदिर देवडी.



अचलपूर -नृसिंह गणेश मंडळ बोरियापुरा.



अचलपूर -नृसिंह गणेश मंडळ बोरियापुरा.

# महिलेवर लैंगिक अत्याचार, मुलाची 91 लाखाने फसवणूक

**अमरावती, ( दि. 2 )**राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका 38 वर्षीय विवाहित महिलेला चाकूचा धाक दाखवत जबरदस्तीने शारिरिक संबंध प्रस्थापित करण्यात आले. एवढेच नव्हे तर तिच्या 21 वर्षीय मुलाला कंपनीत डायरेक्टर बनविण्याचे आमिष दाखवून तब्बल 91 लाख 50 हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी राहुल संतोषकुमार सिंह (46, नंदनवन, औरंगाबाद) याच्याविरुद्ध बलात्कार, धमकी आणि फसवणुकीसह विविध कलमांखाली गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महिला शासकीय सेवेतून सेवानिवृत्त असून सध्या किरकोळ व्यवसाय करते. तिचा पती खासगी क्षेत्रात कार्यरत आहे. महिलेचा मुलगा व्यायामासाठी शहरातील एका मॉलमधील जिमला जात असे. तेथे त्याची आरोपी राहुलशी ओळख झाली. हळूहळू राहुलचे महिलेच्या घराशीही येणेजाणे वाढले. दरम्यान, 3 ऑक्टोबर रोजी महिलेचा मुलगा राहुलसोबत बँकॉकला गेला असता, त्यावेळी राहुलने त्याला एका कंपनीत डायरेक्टर बनविण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर मुलाच्या सांगण्यावरून महिलेने राहुलला तब्बल 91 लाख 50 हजार रुपयांची रक्कम दिली. मात्र, पैसे घेतल्यानंतरही दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही. यानंतर, 26 जून रोजी राहुलच्या वाढदिवसानिमित्त महिला व तिचा पती त्याच्या साईनगर येथील घरात गेले असता, पती बाहेर गेलेल्या संधीचा फायदा घेत राहुलने महिलेला स्पर्श केला. विरोध केल्यावर त्याने चाकूचा धाक दाखवून जबरदस्ती शारिरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच, हा प्रकार कुणाला सांगितला तर तुझ्या मुलासह पतीला जीव गमवावा लागेल, अशी धमकीही दिली. त्यानंतर काही दिवसांनी शेत पाहण्याच्या बहाण्यानेही त्याने महिलेला पुन्हा चाकूचा धाक दाखवत अत्याचार केला. या सर्व प्रकारामुळे संतप्त महिलेने धाडस करून राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

कोणत्याही मार्गाने का होईना मोठ्या प्रमाणावर पैसा कमवायचा हे उद्दिष्ट सरकारमधील काही राजकीय नेत्यांनी ठरविलेले दिसते. रोहित पवार, संजय राऊत, सुषमा अंधारे अशी विरोधी पक्षातील मोजकी मंडळी तोफा डागत असल्या, तरी त्याची दखल घ्यायची नाही असेही ठरल्यासारखे दिसते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबतीत 'दक्ष' असले तरी ज्यांना मंत्रिमंडळात घेतलं त्यापैकी अनेक मंत्री भ्रष्ट व वादग्रस्त आहे. परंतु त्यांनी घेतलेले निर्णय रद्द करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना आहे की नाही? पण त्यांच्याकडूनही असे निर्णय रद्द होत नसल्यामुळे 'एक ही हमाम में सब नंगे' असे आता वाटू लागले आहे. माजी खासदार इम्तियाज जलील यांनी मंत्री संजय शिरसाठ यांचे संभाजीनगर मधील एक हॉटेल व नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील जमिनीचे काही व्यवहार सार्वजनिक केले. त्यामुळे तातडीने शिरसाठ यांनी हॉटेलच्या व्यवहारातून माघार घेतली. मात्र महाराष्ट्राला योग्य तो संदेश पोहोचला होता. भारतीय जनता पक्षाचे व पर्यायाने महायुतीचे सरकार आहे असे म्हटले जाते. परंतु 'ज्याच्या हाती ससा तो पारधी' या म्हणीप्रमाणे प्रत्येकजण हात धुवून पैसा कमविण्याच्या मागे लागलेले दिसतात. पण मुख्यमंत्रीदेखील हतबल झाल्यासारखे वाटतात. काल परवापर्यंत फॉरेस्टच्या असलेल्या जमिनी एमआयडीसीच्या माध्यमातून पद्धतशीरपणे उद्योगपतींना देण्यामागे नक्की कोणाचा वाटा आहे हे तपासले जाईल की नाही शंका आहे. ज्या दिवशी केंद्रात आणि महाराष्ट्रात सत्ता बदल होईल, तेव्हा अशा काही गोष्टी जगासमोर येतील की, त्यामुळे संपूर्ण देशात भुकंप होईल आणि त्याचा केंद्रबिंदू नवी दिल्ली असणार आहे. आज विकास करण्याच्या नावाखाली काही आंतरराष्ट्रीय मार्केट मधुन हजारो करोडोचे कर्ज घेऊन तो पैसा काही कंपन्यांना फिरवला जात आहे, अशी चर्चा आहे. विरोधी पक्षांनी किंवा जनतेने कितीही आरडाओरड केली तरी सरकारला काही फरक पडणार नाही. निवडणूक आयोग, तपास यंत्रणा, संरक्षण यंत्रणा, न्यायपालिका सर्व काही सरकारच्या हातची कठपुतली बनली आहे. सरकार काहीही करुन अजुन दहा वर्ष तरी पायउतार होणार नाही, अशी व्यवस्था झाली की हुकूमशाहीचा अनुभव सर्वांना येईल. आज महाराष्ट्रामध्ये जे काही सत्तांतर झाले होते, ते ईडी, सीबीआयच्या जोरावरच झाले होते हे जगाला माहित आहे. जे लोक भ्रष्ट होते, ज्यांना तुरुंगात जायची भीती होती, आपली कालीमाया वाचवायची होती असा एक ग्रुप भाजपाने सत्तेच्या ताकदीवर आपल्या सोबत घेतला. हा झोल ट्रिलियन डॉलरचा असल्याचे लवकरच देशाला कळेल!

# भूखंडाचे श्रीखंड ओरपायला गर्दी होत आहे!



आमदार रोहित पवार हे सातत्याने महायुती सरकारवर जोरदार टीका करत आहेत. दरम्यान त्यांनी आपण पाच हजार कोटींचा घोटाळा उघडकीस आणणार असल्याचा इशारा दिला होता. त्यांनीच दिलेल्या माहितीनुसार कोकणातील बिवलकर नावाचे कुटुंबीय मराठा साम्राज्याच्या विरोधात ब्रिटिशांना मदत करीत असायचे. त्यामुळे ब्रिटीशांनी चार हजार एकरपेक्षा जास्त जमीन राजकीय इनाम म्हणून त्यांना दिली होती.

रोहा, पनवेल आणि अलिबाग, उरण या जिल्ह्यातील पंधरा गावात ही जमीन आहे. १९५२ मध्ये या बिवलकर कुटुंबाने गोलमाल केला. बॉम्बे सरंजाम जाहगिरी व अन्य इनामे याचा नियम १९५२ मध्ये आला. बिवलकर कुटुंब अत्यंत चतुर असल्याने त्यांनी त्यांनी गडबड घोटाळा करून ब्रिटिशांनी राजकीय इनाम म्हणून दिलेली जमीन तेथील अधिकाऱ्यांना हाताशी धरून व्यक्तीगत इनाम म्हणून दाखवली व घशात घातली.

दरम्यान सिलिंग कायदा १९६१ मध्ये येणार होता, त्यामध्ये व्यक्तिगत इनामाची जमीन कदाचित सरकारकडे जाऊ शकते, म्हणून त्यांनी ती जमीन राखीव वन म्हणून नोंद झाली आणि सिलिंग कायद्यातून हे लोक मुक्त झाले. उद्या ही वन दाखवलेली जमीन परत आपल्या नावावर घेऊ असा त्यांचा प्रयत्न होता. सिलिंग ॲक्टमध्ये १९५९ मध्ये हा गोलमाल केल्याने १९६१ ला आलेल्या कायद्यातून हे वाचले.

१९७५ मध्ये महाराष्ट्र खाजगी वन संपादन अधिनियम आला, ज्यामध्ये त्यांची ही संपूर्ण जमीन शासनाकडे गेली. १९८५ पर्यंत हे बिवलकर शांत बसले. पण बिवलकर कुटुंबाने खाजगी वन संपादन कायदा जमीन यास १९८५च्या दरम्यान हरकत घेतली. यानंतर चार वर्षांनी १९८९ साली जिल्हाधिकाऱ्यांनी बिवलकर कुटुंबाचा अर्ज फेटाळून लावला. १९९० साली ते उच्च न्यायालयात गेले.

२०१४ मध्ये ऑक्टबरमध्ये उच्च न्यायालयाने बिवलकर कुटुंबाच्या बाजूने निकाल दिला. यामध्ये न्यायालयात जेव्हा युक्तीवाद सुरू होता, तेव्हा शासन आणि सिडकोकडून जे वकील होते त्यांनी सिलिंग कायद्याचा मुद्दा प्रभावीपणे मांडला नव्हता. त्यामुळे बिवलकर कुटुंबाच्या बाजूने निकाल लागला.

२०१५ साली ही गोष्ट सरकारच्या लक्षात आली. मग सर्वोच्च न्यायलयात योग्य वकीलांचा वापर करून याला स्थगिती आणली. असे असतांना १९८५ मध्ये हरकत का घेतली? तर १९७१ मध्ये नवी मुंबई प्रकल्पाची घोषणा झाली, ज्यामध्ये ९५ गावे अधिसूचित झाली. १९७२ मध्ये अधिसूचित जमिनी सिडकोकडे देण्याचा शासन निर्णय झाला.

१९८३ मध्ये शासकिय हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला. १९८३ ते ८५ दरम्यान या जमिनी संपादीत करण्यात आल्या. यामध्ये ७१ हेक्टर म्हणजे दीडशे एकर जमीन कलेक्टर व कोर्ट ऑफ वॉड्र्स यांची होती, जी बिवलकर कुटुंबाकडून हस्तांतरित झाली होती. भूसंपादित जमिनीचा फायदा मिळावा म्हणून बिवलकर कुटुंबाने हरकत घेतली होती.

१९८७ मध्ये अजून एक गोलमाल केला, त्यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून बेकायदेशीर अधिसूचना आणली आणि या जमिनीवर मोबदला देखील बिवलकर कुटुंबाने घेतला.

सन १९९० ला शरद पवार जेव्हा मुख्यमंत्री होते, तेव्हा दि. बा.पाटील यांनी एकत्रित बसून स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्यासाठी योजना पीएपीसाठी आणली. यामध्ये बिवलकरांना पैसा दिसल्याने ते पुन्हा जागे झाले आणि १९९३ ला बिवलकर कुटुंबाने सिडकोकडे साडेबारा टक्के योजनेसाठीचा अर्ज केला.

१९९४ ला सिडकोने हा अर्ज फेटाळला. १९९५, २०१०, २०२३ ला देखील सिडकोने अर्ज फेटाळले. तेव्हांचे एमडी अनिल दिघेंनी हा अर्ज फेटाळला आणि लगेचच त्यांची बदली झाली. विजय सिंघल हे नवीन एमडी झाले, त्यांनी देखील या कामासाठी नकार दिला.

असे म्हणतात की, सत्तेतील एका नेत्याने त्यांच्याशी संपर्क साधला आणि सिंघल यांनी एक कल्पना सुचवली की, सिडकोला तुम्ही अध्यक्ष बसवा आणि जी कारवाई करायची ती करा. ही पाच हजार कोटींची जमीन व्यक्तीगत बिवलकरांना देऊन टाका, जी सध्या सिडकोच्या ताब्यात आहे. म्हणजे सिडकोच्या ताब्यात असलेल्या दीडशे एकर जमीनीपैकी साडेबारा टक्के जमीन बिवलकरला देण्यासाठी अध्यक्ष नेमावा लागेल असा सल्ला तिथे असणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिला असे बोलले गेले.

१ मार्च २०२४ रोजी नगर विकास विभागाने बिवलकर कुटुंबाला जमीन वाटप करण्यासाठी आलेले पत्र सिडकोला दिले. दिघेकरांनी ज्या अहवालात बिवलकर कुटुंबाला जमीन देऊ नये असे सांगितले होते, तो अहवाल या पत्राला जोडण्यात आला.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

मध्यंतरी पैशाच्या बॅगेप्रकरणी चर्चेत आलेले मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आता याप्रकरणी गंभीर आरोप होत आहे. त्यांना १६ सप्टेंबर २०२४ मध्ये चेअरमन बनवण्यात आले. शिरसाट यांनी पहिल्याच बैठकीत बिवलकर कुटुंबाला जमीन देण्याचा निर्णय घेतला. त्या गरिबांसाठी असणारी सिडकोच्या ताब्यातील जमीन पहिल्याच बैठकीत बिवलकर कुटुंबाला दिली.

शिरसाटांनी ६१ हजार स्केअर मीटर अशी जमीन, ज्याचे बाजार मुल्य पाच हजार कोटी आहे, ही जमीन बिवलकर कुटुंबाला दिली. तेथे आता डेव्हलपमेंट सुरू होईल, पण त्यामध्ये गरिबाला घरं मिळणार नाहीत तर तिथं श्रीमंताला मिळणार आहेत.

मराठा साम्राज्याविरोधात ब्रिटीशांना मदत केल्याप्रकरणी नवी मुंबई परिसरातील सुमारे चार हजार एकरहून अधिक जमीन ब्रिटीशांनी बिवलकर नावाच्या कुटुंबाला दिली होती. नंतरच्या विविध कायदे, नियम आणि निकालानुसार ही जमीन सरकारजमा झाली, परंतु वेगवेगळ्या प्रकारे गोलमाल करुन ही जमीन परत मिळवण्याचा बिवलकर कुटुंबाने सातत्याने प्रयत्न केला. त्यालाही त्या त्या टप्प्यावर नकार मिळाला, पण विद्यमान मंत्री संजय शिरसाठ यांनी २०२४ मध्ये सिडकोचे अध्यक्ष होताच सगळे नियम बाजूला सारून पहिल्याच बैठकीत यातील सुमारे १५ एकर जमीन या बिवलकर कुटुंबाला देण्याचा निर्णय घेतला.

या जमिनीचा बाजारभाव सुमारे पाच हजार कोटी रुपये असून या जमिनीवर सिडकोला गरीबांसाठी सुमारे दहा हजार घरं बांधता आली असती, पण गरीबांच्या हक्काची जमीन शिरसाठांनी बिवलकर कुटुंबाच्या घशात घातली.

एकीकडं पाच हजारहून अधिक स्थानिक भूमिपुत्र जमिनीसाठी वर्षानुवर्षे संघर्ष करत आहेत, त्यांना जमीन दिली जात नाही. पण मराठा साम्राज्याविरोधात काम करणाऱ्या बिवलकर कुटुंबाला बेकायदेशीरपणे पहिल्याच बैठकीत जमीन दिली जाते, ही एकप्रकारे भूमिपुत्रांच्या बाबतीतही गद्दारीच आहे. त्यामुळं बेकायदा पद्धतीने बिवलकर कुटुंबाला दिलेल्या या जमिनीसह राज्यातील अशा प्रकारच्या सर्वच जमिनी सरकारने परत घेईल की नाही शंकाच आहे.

■ ■ ■

## राज्याच्या ऱ्हासासाठी राज्यकर्त्यांचाच हातभार

बिवलकर कुटुंबाला नगरविकास मंत्री आणि सिडको अध्यक्षांनी मनमानीपणे पात्र ठरवले. हा संपूर्ण कारभार सुलभ करण्यासाठी तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संजय शिरसाट यांची अवघ्या २५ दिवसांसाठी सिडकोच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. नेमक्या याच काळात जमीन वाटप घाईघाईने करण्यात आले. आजही या भागातील हजारो प्रकल्पग्रस्त सिडकोच्या वाटप योजनेंतर्गत जमिनीपासून वंचित आहेत. गरीब आणि अल्पभूधारक प्रकल्पग्रस्त कुटुंबांसाठी जमीन उपलब्ध नसल्याचा दावा सिडकोचे अधिकारी निर्लज्जपणे करतात. आश्चर्याची बाब म्हणजे असे वाटप करताना कोणतेही अडथळे आले नाहीत. राज्याच्या विकासाचा ऱ्हास करण्यात आता राज्यकर्त्यांनीच हातभार लावला आहे, याचे हे उत्तम उदाहरण ठरले. या घोटाळ्यात सहभागी असलेल्या राजकीय नेत्यांना व सिडको अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा होईल की नाही शंकाच आहे. महसूल विभागाच्या संगनमताने हा घोटाळा झाला. नगरविकास विभाग, सिडकोचे अधिकारी, मंत्री यांनी सरकार आणि जनता दोघांचीही फसवणूक केली आहे. याला शेवटी जबाबदार कोण ?

# चार्वाक : पहिला समाजसुधारक

चार्वाक, प्राचीन भारतातला पहिला समाजसुधारक... त्याच्या बायकोच्या लक्षात येत नव्हतं की नवरा नेमकं का करतोय हे काम? आपला नवरा उगीचंच लोकांना 'बुद्धी वापरा, अंधविश्वास ठेवू नका' असं सांगत फिरतोय. चमत्कार म्हणून कायतरी असतं की.. जुनीजाणती माणसं काय येडी हायेत का? असं तिचं म्हणनं होतं.

एका मध्यरात्री चार्वाकानं आपल्या बायकोला गावच्या वेशीजवळ नेलं. तिथनं धुळीच्या रस्त्यावर हाताचे पंजे विशिष्ट पद्धतीनं उठवत उठवत तो गावातल्या चौकापर्यंत आला. नंतर दोघंबी घरी गेले...

दुसऱ्या दिवशी सकाळी तो पुन्हा बायकोला घेऊन चौकात आला. धुळीतल्या खुणा बघून गांवातली लोकं एकमेकांत चर्चा करायला लागलेवते. एका बुजुगार्नं सांगीतलं. हे लांडग्याच्या पावलांचे ठसे आहेत. सगळ्यांनी त्यावर विश्वास ठेवला. 'रात्रीच्या वेळी लांडगा येतोय', अशी अफवा पंचक्रोशीतल्या घराघरात पसरली.

हे सगळं चार्वाक आणि त्याची बायको यांच्यासमोर घडलं. चार्वाकानं बायकोला विचारलं, या धुळीत हे काय आहे? ती म्हणाली, 'हे तुमच्या हाताचे ठसे आहेत! तो म्हणाला, कायतरीच काय? गांवच काय अख्खी पंचक्रोशी म्हणतीय, हे लांडग्याच्या पावलांचे ठसे आहेत.. ते काय वेडे आहेत का? यावर ती म्हणली, पंचक्रोशीतल्याच काय, सगळ्या जगातल्या लोकांनी येऊन मला तसं सांगितलं, तरी मी ते खरं मानणार नाही. कारण, हे ठसे तुम्ही आपल्या हातांनी उठवल्याचं मी माझ्या डोळ्यांनी पाहिलं आहे.

चार्वाक म्हणाला, मग इतकी वर्षं मी तरी लोकांना दुसरं काय करायला सांगतोय ?

विवेकी विचार म्हणजे काय? याचं याहून चांगलं उदाहरण नाय माझ्या भावांनो. विवेकी माणूस ऐकलेली गोष्ट नीट पडताळून पाहून, परीक्षा करून मग खरं-खोटं, योग्य-अयोग्य ठरवतो. मुर्ख माणूस दुसरा सांगेल ते ऐकून आंधळा विश्वास ठेवतो.

आज आपण सगळे सुशिक्षित आहोत. कुठलीबी गोष्ट असूद्या... व्हॉटसॲपवरचा फॉर्वडेड मेसेज असू द्या, नायतर न्यूज चॅनलवरची बातमी असू द्या... त्या गोष्टीची नीट, चारीबाजूनी, मेंदू वापरून चिकीत्सा केल्याशिवाय आंधळेपणानं विश्वास कसा ठेवू शकतो आपण?

'आपली बुद्धी वापरायचं स्वातंत्र्य', 'आपला विवेक वापरायचा अधिकार' या निसर्गाने आपल्याला दिलेली लै लै लै मोलाच्या देणग्या हायेत, त्याचा व्यवस्थित वापर करा, हे सांगीतलं होतं पाच हजार वर्षांपूर्वीच्या चार्वाकांनी... अडीच हजार वर्षांपूर्वीच्या बुद्ध, बसवण्णा, चक्रधरस्वामींनी... तीनशे वर्षांपूर्वीच्या तुकोबारायांनी.. आणि आजच्या दाभोलकरांपर्यन्त सगळ्यांनी!

चार्वाकाला लोकांनी जाळून मारलं... चक्रधरस्वामी आणि तुकोबाराया अचानक बेपत्ता झाले...कुणी म्हणे तुकोबा गरूडावरून वैकुंठी गेले..कुणी म्हणे चक्रधर उत्तरेकडे निघून गेले.. आणि दाभोलकरांना तर... असो.

विवेकी विचार करा, असे सांगणाऱ्यांना अभिवादन करण्यापेक्षा त्यांचा 'विचार' पुढच्या पिढीत रूजवूया, मुरवूया, भक्कम करूया... चार्वाकासारखं किमान आपल्या घरात तरी ते आपण करू शकतो. एवढं जरी आपण केलं, तरी या महापुरूषांचं आपल्यासाठी जगणं आणि आपल्या सगळ्यांच्या हितासाठी मरणंबी सार्थकी लागंल !

--------------

**किरण माने**

■ ■ ■

# २० वर्षे काम न करता पगार मिळवण्याचा खटला



आगळंवेगळं

फ्रान्समध्ये, एका महिलेने २० वर्षे काम न करता पगार मिळाल्याने तिच्या कंपनीविरुद्ध खटला दाखल केला. प्रत्यक्षात, ५९ वर्षीय लॉरेन्स व्हॅन वासेनहोव्ह १९९३ मध्ये एका मोठ्या टेलिकॉम कंपनीत रुजू झाली. नंतर तिला अपस्मार आणि हेमिप्लेजिया (शरीराच्या एका भागाचा अर्धांगवायू) झाला. त्यानंतर तिला सेक्रेटरीची नोकरी देण्यात आली.

२००२ मध्ये, कंपनीने तिला स्टँडबायवर ठेवले. २० वर्षांहून अधिक काळ तिला कोणतेही काम देण्यात आले नाही. कोणतीही जबाबदारी नव्हती. कोणाशीही संपर्क नव्हता. ती म्हणते, 'मला असे वाटले की मी अस्तित्वातच नाही.' ती म्हणाली की घरी काम न करता पगार मिळवणे हा फारसा फायदा नाही, ते खूप कठीण आहे.

**कंपनीवर भेदभावाचा आरोप**

आता लॉरेन्सने ऑरेंज कंपनीवर खटला दाखल केला आहे. कंपनीने तिच्या आरोग्याच्या गरजांकडे दुर्लक्ष केल्याचा तिचा आरोप आहे. फ्रेंच कायद्यानुसार, कंपनीने तिला काम द्यायला हवे होते. लॉरेन्सचे वकील म्हणतात की हा भेदभाव आहे. कंपनी म्हणते की त्यांनी महिलेच्या वैयक्तिक परिस्थितीची काळजी घेतली होती. त्यांनी म्हटले की लॉरेन्स अनेकदा रजेवर असायची. त्यामुळे तिला कोणतीही नवीन भूमिका देता येणार नाही.

■ ■ ■

# मोबाईलच्या पडद्यामागे हरवतेय बालपणाची निरागसता


नागपूरमध्ये अलीकडेच घडलेली एक हृदयद्रावक घटना संपूर्ण समाजाला हादरवून गेली. एका अल्पवयीन मुलाने अपयशी प्रेमसंबंधामुळे १६ वर्षीय मुलीची भररस्त्यावर निर्दयपणे हत्या केली. ही घटना फक्त एका कुटुंबाची शोकांतिका नाही, तर समाजासमोर उभा राहिलेला गंभीर प्रश्न आहे झ्र आपल्या मुलांच्या मानसिकतेचं घडणं आज कोणत्या दिशेने चाललं आहे?

आज मोबाईल मुलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. शिक्षण, मनोरंजन, मित्रमैत्रिणींसोबतचा संवाद यासाठी तो आवश्यक झाला आहे. पण त्याचं चुकीच्या प्रकारे व अतिरेकी प्रमाणात होणारं वापर मुलांच्या मनावर घातक परिणाम करत आहे. मोबाईलवरील हिंसक खेळ, अश्लील व्हिडिओ, उत्तेजक रील्स आणि तात्काळ प्रतिसादाची सोशल मीडिया संस्कृती यामुळे मुलांची सहनशीलता कमी होत आहे. थोडासा अपयश किंवा नकार मिळाल्यावर अनेक मुलं राग, सूड आणि हिंसक मार्ग स्वीकारतात.

याहूनही चिंताजनक बाब म्हणजे, पालकांनी मोबाईल मर्यादित वेळेसाठी द्यावा किंवा काही वेळेस नाकारावा, तर अनेक मुलं टोकाची पावलं उचलतात. आत्महत्येचा प्रयत्न, घर सोडून जाणं, भांडणं करणं या घटना समोर येतात. म्हणजेच मोबाईल मुलांच्या जीवनाचं केंद्रबिंदू बनलं असून त्याशिवाय ते स्वतःला असहाय समजू लागले आहेत. ही व्यसनाधीनतेसारखीच परिस्थिती आहे.

परंतु, समस्या केवळ मोबाईलच्या वापरात नाही, तर त्यावर सहज उपलब्ध असणाऱ्या साहित्यामध्येही आहे. गूगल, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब यांसारख्या मंचांवर अश्लील साहित्य, भडकावू व्हिडिओ व उत्तेजक रील्स मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. हे कंटेंट मुलांना वेळेआधी मोठं बनवतो आणि त्यांची नातेसंबंध व समाजाकडे पाहण्याची दृष्टि विकृत करतो.

याबाबत कायद्याने अनेक तरतुदी केल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० आणि आयटी नियम २०२१ अंतर्गत सोशल मीडिया कंपन्यांवर अश्लील व हानिकारक कंटेंट हटवण्याची जबाबदारी आहे. तक्रार मिळाल्यानंतर २४ तासांत सामग्री हटवणे बंधनकारक आहे.



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

भारतीय दंड संहिता कलम २९२, २९३* अश्लील साहित्याच्या प्रसारावर दंडाची तरतूद करतात. तसेच POCSO कायदा २०१२ नुसार अल्पवयीन मुलांना अश्लील साहित्य दाखवणे हा गंभीर गुन्हा मानला जातो.

सरकारने हे नियम अधिक कठोर करून अश्लील व उत्तेजक रील्स तयार करणाऱ्यांवर, त्यांचा प्रसार करणाऱ्यांवर आणि त्याला प्रोत्साहन देणाऱ्या प्लॅटफॉर्म्सवर कठोर कारवाई करायला हवी.

तसेच कंटेंट फिल्टरिंग, वयाची पडताळणी (age verification) आणि मुलांसाठी सुरक्षित डिजिटल स्पेसची अंमलबजावणी बंधनकारक करणे आवश्यक आहे.

परंतु केवळ कायदे करून प्रश्न सुटणार नाही. पालक व शिक्षक यांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. घरात संवादाचं वातावरण असायला हवं. मुलांना योग्य-अयोग्य याची जाणीव करून द्यायला हवी. मोबाईलचा मर्यादित व शिस्तबद्ध वापर कसा करावा हे शिकवायला हवं.

शाळांमध्ये डिजिटल साक्षरतेसोबत भावनिक शिक्षणालाही महत्त्व द्यायला हवं, जेणेकरून मुलं अपयश स्वीकारणं, राग नियंत्रित करणं आणि नातेसंबंधात मर्यादा पाळणं शिकतील.

नागपूरची घटना समाजाला स्पष्ट संदेश देते की वेळ निघून जाण्याआधी पावलं उचलणं गरजेचं आहे. मोबाईल हा स्वतःमध्ये शत्रू नाही, पण त्याचा अनियंत्रित व चुकीचा वापर निश्चितच समाजासाठी घातक ठरत आहे. मुलांच्या हातात मोबाईल देण्याआधी त्यांच्या मनात योग्य संस्कार देणं हीच खरी जबाबदारी आहे.

■ ■ ■

# ५८० शिक्षकांवर अटक वॉरंट हास्यास्पद

नागपूरमधील शालार्थ आयडी पेरोल चौकशीत ५८० शिक्षक व शाळा कर्मचारी अटकेच्या विळख्यात येऊ शकतात, अशा मथळ्यांनी गेल्या काही दिवसांत अनेक मराठी वृत्तपत्रं गाजली. परंतु चौकशी पूर्ण होण्याआधी व न्यायालयीन प्रक्रिया सुरू होण्याआधीच अशी छाप निर्माण होणे म्हणजेच माध्यमांतूनच अटक वॉरंट निघाल्यासारखा भास निर्माण होतो. त्यामुळे ५८० शिक्षकांवर अटक वॉरंट ही हास्यास्पद बाब ठरणार का?

शालार्थ आयडी घोटाळा

**राज्यव्यापी अहवाल अद्याप नाही**

सध्या चौकशी जिल्हानिहाय सुरू असून, राज्य पातळीवरील सर्वंकष चित्र समोर आलेले नाही. जुलै २०२५ मध्ये स्थापन झालेल्या राज्य एसआयटीने अद्याप महाराष्ट्रातील संपूर्ण आढावा प्रसिद्ध केलेला नाही.

या पॅटर्नचा विस्तार झाला, तर १५ हजार हून अधिक शिक्षक, मुख्याध्यापक व अनुदानित शाळांचे प्रशासक चौकशीत सापडू शकतात, असा अंदाज जुलै महिन्यातच वृत्तपत्रांत वर्तविला होता. अलीकडे जळगाव व जालना येथील वृत्तपत्रांत ३ हजार ते ७ हजार कर्मचाऱ्यांवर कारवाईच्या बातम्या छापल्या गेल्या असून, या अंदाजाला अधिक बळकटी मिळते आहे.

**आकड्यांपलिकडे परिणाम:**

- आजवर माध्यमांचे लक्ष फक्त शिक्षक व प्रशासकीय गैरव्यवहारांवर राहिले आहे. परंतु यामुळे थेट शैक्षणिक व सामाजिक परिणाम होणार आहेत.
- जर १० हजार शिक्षकांवर कारवाई झाली, तर जवळपास २ लाख विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत होईल.
- याचा थेट परिणाम सुमारे ४ लाख पालकांवर होऊन अस्वस्थता व गोंधळ वाढू शकतो.



अरूण सोपानराव कराळे
जिल्हा कार्याध्यक्ष,
विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ,नागपूर (महानगर)
९०९६३२६२७२

नागपूरमधील काही शाळांनी पालकांसोबत अनौपचारिक बैठकांचे आयोजन सुरू केले असून, मोठ्या प्रमाणावर निलंबन किंवा अटक झाली, तर स्थानिक समुदाय अस्थिर होण्याची भीती आहे.

**राजकीय वातावरण तापतेय**

नागपूरमधील काही नेत्यांनी गेल्या आठवड्यांत शिक्षकांना पाठिंबा देणारे संकेत दिले आहेत. जर चौकशी स्पष्ट निकर्षांशिवाय राबवली गेली, तर ती सहजपणे शिक्षकांचा छळ म्हणून पाहिली जाऊ शकते.

शालार्थ कृती समितीने जेल भरो आंदोलन करण्याची तयारी सुरू केल्याचे वृत्त आहे. समितीची भूमिका स्पष्ट आहे, शालार्थ प्रक्रियेशी कोणत्याही प्रकारे संबंधित प्रत्येक व्यक्तीला गुन्हेगार मानले जाऊ नये.

राज्य सरकारने अनुदानित शाळांच्या बजेटमध्ये कपात केल्याने मागील काही वर्षांत ३ हजार हून अधिक मराठी माध्यम ग्रामीण शाळा बंद पडल्या आहेत. शालार्थ चौकशीचा परिणाम याच मराठी समाजावर होणार असून, तो आधीच असुरक्षित घटक मानला जातो.

**निष्कर्ष**

मराठी माध्यम अनुदानित शिक्षण कमकुवत करून खासगी शिक्षणाला चालना दिल्याचे आरोप आधीच होत आहेत. त्यात शालार्थ चौकशीचा सूर जर अटक व छळाच्या दिशेने गेला, तर ह्यघोटाळा चौकशीह्न ऐवजी शिक्षकांचा छळ असा कथानक पुढे सरकू शकतो, अशी चिंता व्यक्त केली जाते.

■ ■ ■

# कच्चे न्यूडल्स खाणे घातक





भूक लागली की काही झटपट आणि चविष्ट खाण्याची अनेकांची इच्छा होती. स्नॅक्समध्ये न्यूडल्स हा प्रकार मोठ्या प्रमाणात खाल्ला जातो. न्यूडल्स बनवताना काहींना ते कच्चे खाण्याची सवय असते. किशोरवयीन मुलांचं हे सर्वांत आवडतं स्नॅक आहे. परंतु हेच कच्चे न्यूडल्स जीवघेणे ठरू शकतात, हे तुम्हाला माहीत आहे का?

इजिप्तमध्ये एका १३ वर्षीय मुलाने नाश्त्यामध्ये एक किंवा दोन नव्हे तर 3 पॅकेट्स कच्चे न्यूडल्स खाल्ले होते. त्यानंतर त्याची प्रकृती बिघडली. न्यूडल्स खाल्ल्यानंतर काही वेळातच त्याला पोटात तीव्र वेदना जाणवू लागल्या आणि तो अचानक उलट्या करू लागला.

कुटुंबीयांनी मुलाला ताबडतोब रुग्णालयात दाखलं केलं. परंतु डॉक्टर त्याचे प्राण वाचवू शकले नाहीत. जर तुम्हालाही कच्चे न्यूडल्स खाण्याची सवय असेल तर सावध व्हा. कारण तुमच्या आरोग्यासाठी हे अत्यंत घातक ठरू शकतं.

जर तुम्ही कच्चे न्यूडल्स अधिक प्रमाणात खाल्ले तर त्यामुळे तुमच्या पचनसंस्थेत अडथळा निर्माण होऊ शकतो. डॉक्टरांच्या मते, इन्स्टंट न्यूडल्समध्ये सोडियमचं प्रमाण खूप जास्त असतं. हल्ड नुसार, तुम्ही एका दिवसात फक्त २००० मिलीग्रॅम पर्यंत सोडियम खाऊ शकता. ही रोजची मर्यादा आहे.

इन्स्टंट न्यूडल्यच्या एका पॅकेटमध्ये १८२९ मिलीग्रॅम सोडियम असतं. शरीरात अधिक प्रमाणात सोडियम गेल्यास रक्तदाब अचानक वाढू शकतो आणि त्याचा परिणाम हृदयावरही होऊ शकतो.

कच्चे न्यूडल्स पचायला जड असतात. त्यामुळे मधुमेह आणि कर्करोगाचाही धोका वाढतो. कच्च्या न्यूडल्यमुळे शरीरातील पाण्याचं प्रमाणही कमी होऊन डिहाड्रेशनचा त्रास जाणवू शकतो. म्हणूनच सहसा इन्स्टंट न्यूडल्स खाऊ नये आणि खाल्ले तर ते कायम शिजवूनच खावेत, असा सल्ला डॉक्टर देतात.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### लय झालं ना बावा!

तांडवनृत्य करूनी
कां घातले थैमान
भुईसपाट झाला ना
जगाचा पोशिंदा किसान

जीवनदाता ऐसी
तुझी जगी किर्ती
निष्ठूरतेने पुराचे
बळी घेशील किती ?

पावसा रे पावसा
तू लई थकलास
आता विश्रांती घे
एक महिना झकास..

# गणेश विसर्जन व ईद-ए-मिलाद निमित्त अमरावती पोलिसांचा 'सुरक्षा प्लॅन'

## पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी घेतली मार्ग व विसर्जन स्थळांची पाहणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )** - शहरात 6 सप्टेंबरपासून सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जनाला सुरुवात होणार असून, 5 सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद सण साजरा केला जाणार आहे. या दोन्ही धार्मिक कार्यक्रमादरम्यान शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर नियोजन केले आहे.

1 सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी राजापेठ, फ्रेजरपुरा आणि बडनेरा हद्दीतील गणपती विसर्जन मार्ग तसेच छत्री तलाव, प्रथमेश तलाव आणि कोंडेश्वर तलाव या ठिकाणांची पाहणी केली. या वेळी त्यांनी मिरवणुकीच्या मार्गावर बॅरीकेट्स, प्रकाशयोजना, सीसीटीव्ही, आपत्कालीन दिवे, मचान व्यवस्था, कृत्रिम तलाव, झाडांची छाटणी, पिण्याचे पाणी आणि स्वीमर्सची नेमणूक करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या.



ईद-ए-मिलाद निमित्त 5 सप्टेंबर रोजी निघणाऱ्या मिरवणुकीच्या मार्गाचीही पोलीस आयुक्तांनी पाहणी केली. मिश्कीनशहा मस्जिद येथून सुरू होणारी ही मिरवणूक हातीपुरा, नागपुरी गेट, हबीबनगर, गवळीपुरा, लोहाबाजार, छत्रपुरी खिडकी, चांदणी चौक, पठाण चौक मार्गे मद्रासीबाबा दर्गायापर्यंत जाणार आहे. या मार्गावर वाहतूक व सुरक्षा नियोजनाबाबत पोलिस अधिकाऱ्यांना त्यांनी विशेष सूचना केल्या.

दरम्यान, सोशल मीडियावर सायबर पोलिसांचे विशेष पथक सतत वॉच ठेवणार असून, विसर्जन स्थळे व मिरवणूक मार्गांवर सीसीटीव्ही आणि व्हिडिओग्राफीच्या माध्यमातून लक्ष ठेवले जाणार आहे. मिरवणुकीदरम्यान ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे, आक्षेपार्ह गाणी, वादग्रस्त देखावे यावर बंदी घालण्यात आली आहे. सराईत गुन्हेगार, समाजकंटक व दंगलखोरांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेशही पोलीस आयुक्तांनी दिले आहेत. शहरातील सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी नागरिकांनी यापूर्वी पोलिसांना सहकार्य केले असून, यंदाही शांतता आणि एकोपा जपण्याचे आवाहन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी केले आहे.

# अमरावतीत दोघांच्या दुचाकींची चोरी

**अमरावती, ( दि. 2 )** शहरात दुचाकी चोरीच्या घटना वाढीस लागल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. दोन दिवसांत दोन वेगवेगळ्या भागातून दुचाकी चोरीला गेल्याचे प्रकार समोर आले आहेत. फ्रेजरपुरा आणि छायानगर भागात घडलेल्या या दोन्ही घटनांमध्ये अज्ञात चोरट्यांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले असून तपास सुरू आहे. सततच्या चोरीच्या घटनांमुळे शहरात भीतीचे वातावरण असून पोलिसांनी या चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास मोहीम सुरू केली आहे.

फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एक घटना उघडकीस आली. सुरेंद्र सुखदेवराव पारीसे (वय 40, रा. महावीर नगर, अमरावती) यांनी आपली दुचाकी सकाळी 10 वाजता दस्तुरनगरातील अयुर मॉलजवळ उभी केली होती. रात्री 9 वाजेपर्यंत परतल्यावर गाडी चोरीस गेल्याचे आढळले. त्यांनी या घटनेची तक्रार फ्रेजरपुरा पोलिसात दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**घरासमोरून दुचाकी लंपास**

दुसरी घटना नागपुरी गेट हद्दीतील छायानगर भागात उघडकीस आली. शेख इरफान शेख अकबर (वय 29, रा. छायानगर, अमरावती) यांनी आपल्या घरासमोर टीव्हीएस जुपिटर गाडी उभी केली होती. अर्ध्या तासात परत आल्यावर दुचाकी चोरीला गेल्याचे दिसून आले. त्यांच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# जुना धामणगाव हद्दवाढ ठरावावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि. 2 )** - जुना धामणगाव परिसराचा हद्दवाढ ठराव ग्रामसभेत मंजूर झाल्यानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी हा प्रस्ताव आपल्या कार्यकाळात दिल्याचा दावा केला असताना विद्यमान आमदार प्रताप अडसड यांनी जोरदार पलटवार करत विरोधकांना टोला लगावला.

अडसड यांनी प्रश्न उपस्थित केला की, जर खरंच प्रस्ताव 2009 मध्ये दिला असेल तर 15 वर्षांच्या कार्यकाळात त्याची अंमलबजावणी का झाली नाही? पाणीपुरवठ्यासारखा जिव्हाळ्याचा प्रश्न त्यांनी सोडवला नाही, हेच दाखवते की त्यांच्याकडे इच्छाशक्तीच नव्हती. त्यांनी पुढे सांगितले की, देवेन्द्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर माझ्या पाठपुराव्यामुळे व तत्कालीन सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच भाजप पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने मोठा निधी मिळवून पाणीपुरवठा






योजनेची अंमलबजावणी केली. कॉलनीवासीयांना त्याचा थेट लाभ मिळाला.

अडसड यांनी स्पष्ट केले की, आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात तीन कोटींपेक्षा जास्त निधी उपलब्ध करून देत कॉलनी परिसरात पाइपलाईनचे काम पूर्ण केले. यामुळे नागरिक आमच्या सरकारचा विकासात्मक दृष्टिकोन आणि विरोधकांची निष्क्रियता यामध्ये स्वत:च फरक ओळखू शकतात, असे ते म्हणाले.

त्यांनी विरोधकांवर टीका करताना नमूद केले की, काही लोक समाजहितासाठी नव्हे तर केवळ आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी मुद्दाम या प्रश्नावर राजकारण करत आहेत. मात्र नागरिकांनी त्यांचा हा प्रयत्न आधीच फोल ठरवला आहे. शेवटी अडसड यांनी ठामपणे सांगितले की, भरीव निधीमुळे सुरू झालेला विकास आणि नगरपरिषद हद्दवाढीचा निर्णय हा आमच्या बांधिलकीचा पुरावा आहे. याची तुलना विरोधकांच्या पंधरा वर्षांच्या कार्यकाळाशी केली तर आमची कामगिरीच ठळक ठरते. ग्रामसभेतील ठरावानंतर आरोप-प्रत्यारोपांनी रंगत आणली असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा अधिक गडद होणार असल्याचे राजकीय वर्तुळात स्पष्ट दिसत आहे.

# पहिल्याच शिबिरात 207 रुग्णांची तपासणी

**मेळघाट आरोग्य परिक्रमेत घेणार 56 शिबीर**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )** - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार मेळघाटात आदिवासी बांधवांच्या आरोग्याच्या दृष्टीने मेळघाट आरोग्य परिक्रमा अभियान सुरू झाले आहे. या अभियानांतर्गत एकूण 56 आरोग्य शिबिरे घेण्यात येणार असून यात सोनोग्राफी, एक्स-रे, औषधोपचार यांसह विविध आरोग्य सुविधा मोफत पुरवल्या जाणार आहेत.




या अभियानातील पहिले शिबीर चिखलदरा येथे पार पडले. या शिबीरात एकूण 207 रुग्णांची तपासणी करण्यात आली. तपासण्यात आलेल्या रुग्णांमध्ये गर्भवती माता, वृद्ध, महिला व बालकांचा समावेश होता. शिबिरात स्त्रीरोग विभागात 71, अति जोखमीच्या माता 52, स्तनदा माता 19, बालरोग 49, नेत्ररोग 39, असंसर्गजन्य रोग 48, ईसीजी 19, मोतीबिंदू 9, शस्त्रक्रिया 7, हृदयरोग 2, मधुमेह 2 अशा विविध तपासण्या करण्यात आल्या. याशिवाय 52 रुग्णांची सोनोग्राफी झाली असून त्यापैकी 24 रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले.

मेळघाटातील आदिवासींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून हे अभियान राबवले जात आहे. दर आठवड्यात एक अशा पद्धतीने दरमहा चार शिबिरे आणि पुढील सात महिने ही मोहीम चालणार आहे. तपासणीसह उपचार व औषधोपचार मोफत देण्यात आले.

या शिबिरात शल्यचिकित्सक डॉ. संजय पाठक, बालरोग तज्ज्ञ डॉ. विजयसिंग राजपुर, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. आशिष धवळे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. स्नेहल शेट्टी आदींनी सेवा बजावली. जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या संकल्पनेतून या अभियानाची अंमलबजावणी होत असून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तिलोत्तमा वानखेडे यांच्यासह तज्ज्ञ डॉक्टर व गोडे वैद्यकीय महाविद्यालयाच्या पथकाने सहकार्य केले.

# शनिवारपेठेत रस्त्यांवर पुन्हा थुकपट्टी!

**किती दिवस फाटलेल्या चड्डीला ठिगळ लावणार? | नागरिकांचा सवाल**



**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, ( दि. 2 )** - शहरातील शनिवारपेठ, देशमुखपुरा, साखरपुरा आणि संत्रा लिलाव व्यापारी परिसरातील नागरिकांनी आमदार यावलकर व नगरपालिका प्रशासनाबद्दल तीव्र रोष व्यक्त केला आहे. रेस्ट हाऊस ते गजानन महाराज मंदिर मार्ग तसेच शनिवारपेठ परिसरात खड्डे बुजवण्यासाठी दगडी मुरूम टाकून पुन्हा एकदा थुकपट्टी करण्यात आली. मात्र हा फक्त तात्पुरता उपाय असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. फाटलेल्या चड्डीला ठिगळ लावल्यासारखी कामे करून



नागरिकांची फसवणूक केली जाते आहे अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली.

### निधी आणणार केव्हा?

नागरिकांनी सवाल केला आहे की, आमदार साहेब, निवडून येऊन एक वर्ष पूर्ण झाले, तरीही शनिवारपेठ व आसपासच्या भागातील नागरिकांना सावत्र वागणूकच मिळते आहे. कायमस्वरूपी डांबरी रस्ता करण्यासाठी आवश्यक निधी आणणार नेमके केव्हा? असा थेट प्रश्न विचारला आहे.

### मिरवणुकीत गणेशभक्तांचे पाय रक्ताळणार?

लवकरच गणेशोत्सवाला सुरुवात होणार आहे. प्रसिद्ध शनिवारपेठ राजा आदर्श गणेश मंडळाच्या मिरवणुकीस हजारो भक्त अनवाणी पायाने सहभागी होणार आहेत. पण रस्त्यावर टाकलेले धारदार दगडी मुरूम त्यांच्या पायांना इजा पोहोचवू शकतात. गणपती बाप्पाच्या मिरवणुकीत भक्तांच्या पायाचं रक्त काढण्याचं पाप करू नका साहेब अशी आर्त हाक नागरिकांनी दिली आहे.

### संयम संपण्याआधी उपाययोजना करा!

नागरिक म्हणतात की, आतापर्यंत त्यांनी संयम बाळगला आहे. मात्र, शहरातील नागरीक अजूनही पूर्णपणे जागृत झालेले नाहीत, पण जर आम्हाला वारंवार दुर्लक्षित केले गेले, तर आंदोलन अपरिहार्य होईल असा इशारा त्यांनी दिला आहे. नगरपालिका प्रशासन आणि आमदारांनी तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी रस्त्याचा प्रश्न सोडवावा, हीच सर्वांची अपेक्षा आहे.

# शेतकरी मनोज मुळे यांचे निधन

**हिवरखेड-** येथील गरीब शेतकरी कुटुंबातील सुपुत्र मनोज शामरावजी मुळे (वय 40) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. त्यांच्याकडे केवळ दोन एकर शेती होती. मात्र सततच्या नापिकीमुळे आणि वाढत्या आर्थिक संकटामुळे त्यांच्यावर बँकेचे तसेच खासगी मिळून जवळपास पाच लाखांचे कर्ज झाले होते. त्यामुळे ते नेहमीच विवंचनेत जगत होते.

मुळे यांच्यावर त्यांच्या वृद्ध आई आणि मोठ्या आईची जबाबदारी होती. कुटुंबातील हे दोन्ही आधारवड आता म्हातारपणात पूर्णपणे एकटे पडले आहेत. कुटुंबाच्या ओढगस्तीच्या परिस्थितीत अचानक झालेले हे निधन अत्यंत हृदयद्रावक ठरले आहे.

मुळे यांचा अंतिम संस्कार दिनांक 1 सप्टेंबर 2025 रोजी हिवरखेड येथील निर्मिक



स्मशानभूमीत करण्यात आला. या प्रसंगी नातेवाईक, मित्रमंडळी आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे आणि आकस्मिक मृत्यूचे प्रमाण सतत वाढत असताना अशा घटनांनी समाज अस्वस्थ होत आहे. या गरीब कुटुंबाच्या दु:खात शासनाने फुल नाही तरी फुलाची पाकळी मदत करावी, असे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे.

# चांदुरबाजार ते परतवाडा मार्गावरील टोल लवकरच होणार सुरू

**अपूर्ण पुलांमुळे नागरिकांमध्ये संताप | काम अधुरं तर टोल कसला? | नागरिकांचा सवाल**




**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार, ( दि. 2 ) - चांदुरबाजार ते परतवाडा मार्गावरील प्रवास आता महागणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 353 वर हैदतपूर येथे उभारण्यात आलेल्या टोल नाक्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, लवकरच वाहनचालकांना टोल भरावा लागणार आहे.**

### तक्रारींना प्रतिसाद नाही

या संदर्भात संबंधित यंत्रणांकडे अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या आहेत, मात्र अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. नागरिकांचा आग्रह आहे की, प्रकल्प पूर्ण होईपर्यंत टोल स्थगित ठेवावा आणि टोल वसुली प्रक्रियेत पारदर्शकता राखावी.

### प्रशासनाकडून ठोस भूमिका कधी?

प्रशासनाने या संतापाची गंभीर दखल घेऊन टोलबाबत योग्य ती पावले उचलावीत, अशी सर्वसामान्य नागरिकांची ठाम मागणी आहे. अन्यथा या निर्णयाविरोधात आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशाराही नागरिक देत आहेत.

### अपूर्ण कामावर टोल?

टोल सुरू होण्याआधीच नागरिकांमध्ये नाराजीचा स्वर उमटू लागला आहे. कारण या महामार्गावर अजूनही दोन महत्त्वाचे पूल पूर्ण झालेले नाहीत. तसेच काही ठिकाणी रस्ते अपायकारक अवस्थेत आहेत. प्रवास अधिक कठीण होत असताना टोल वसूल करण्याचा निर्णय नागरिकांना अन्यायकारक वाटतो आहे.

### प्रथम सोयी, मग टोल

स्थानिक जनतेचे म्हणणे आहे की, रस्ते व पूलांचे काम पूर्ण झाल्याशिवाय टोल लागू करणे अयोग्य आहे. अर्धवट सोयीसुविधा देऊन टोल वसूल करणे म्हणजे सरळ सरळ फसवणूकच असा संतप्त सूर नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



रामदेव बाबा गणेश मंडळ अंबाडा




गजानन बाल गणेश मंडळ अंबाडा



श्री मुदगलेश्वर गणेश मंडळ अंबाडा




गजानन सर्वोदय गणेश मंडळ अंबाडा



आदिवासी गणेश मंडळ अंबाडा

# विविधा...



# विद्यार्थ्यांच्या चिंताजनक आत्महत्या

अलिकडल्या काळात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांत प्रचंड वाढ झाली आहे. दररोजच्या वर्तमानपत्रात शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची एखादी तरी बातमी असतेच. विद्यार्थी आत्महत्यांच्या वाढत्या घटनेबाबत सर्वत्र चिंता व्यक्त केली जात आहे. भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांबाबत भारतातच नव्हे तर जगभर चिंता व्यक्त होत आहे.

मागील वर्षी भारतातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत एक अहवाल प्रसिद्ध झाला होता. नॅशनल क्राईम ब्युरोच्या डेटावर आधारित स्टुडंट्स सुसाईड : अन अपेडेमिक स्वीपिंग इंडिया नावाचा अहवाल वार्षिक आयसी ३ परिषद आणि आणि एक्स्पो २०२४ मध्ये जाहीर करण्यात आला होता. हा अहवाल अतिशय धक्कादायक आहे.

या अहवालात आपल्या देशातील आत्महत्यांचे वास्तव मांडण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील आत्महत्यांच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. दरवर्षी देशभरात ७० हजारांहून अधिक नागरिक आत्महत्या करत असून यात सर्वात जास्त आत्महत्या पुरोगामी महाराष्ट्रात होत आहेत. त्यातही धक्कादायक आणि चिंताजनक बाब म्हणजे यात सर्वाधिक आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. त्यातही पुरोगामी महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो.

महाराष्ट्रात सर्वाधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड या राज्याचा क्रमांक लागतो. विद्यार्थी आत्महत्येत महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असणे ही भूषणावह बाब नसून शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणारी ही बाब आहे.

कणखर देशा राकट देशा दगडांच्या देशा असा महाराष्ट्राचा उल्लेख होतो त्यात दुर्दैवाने आत्महत्यांच्या देशा असेही नमूद करावे लागत आहे. आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या भारतात आहे आणि यात सर्वात जास्त तरुणांची संख्या आहे. भारतात तरुणांची संख्या जवळपास ६० टक्के इतकी आहे. इतके तरुण जगातील कोणत्याच देशात नाहीत म्हणूनच भारताकडे आगामी महासत्ता म्हणून पहिले जाते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणांच्या जोरावरच भारत जागतिक महासत्ता बनेल असा विश्वास त्यांना होता.

ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण जर असा अकाली मृत्यूला कवटाळू लागला तर देशाच्या भविष्यावरच प्रश्न चिन्ह निर्माण होऊ शकते म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या आत्महत्या राज्यकर्त्यांनी गांभीर्याने घ्याव्यात आणि आत्महत्या कमी रोखण्यासाठी ठोस धोरण आखायला हवे.

अर्थात विद्यार्थी आत्महत्या का करतात याचाही विचार व्हायला हवा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे अनेक करणे आहेत त्यातील प्रमुख कारण म्हणजे पालकांच्या मुलांकडून अनाठायी अपेक्षा. शिक्षणातील भयंकर स्पर्धा, गुणांची जीवघेणी चढाओढ, शिक्षण घेऊनही रोजगार न मिळणे, प्रेमभंग या आणि अशा अनेक कारणांमुळे तरुण अकाली मृत्यूला कवटाळीत आहेत.

समाज माध्यमांचा वाढता प्रभाव हे देखील विद्यार्थी आत्महत्यांच्या कारणांपैकी महत्वाचे कारण आहे. समाज माध्यमांच्या आहारी गेल्यामुळे मुले खूप भावनिक झाली आहे. आपल्या भावनांना आवर न घालता आल्याने मुले आत्महत्येचा मार्ग स्वीकारीत आहेत. ब्लू व्हेल, पोकोमन यासारख्या हिंसक गेम्समुळे अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे.

विद्यार्थ्यांना पालकांकडून हल्ली अनेक गोष्टी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत त्यामुळे एखादी गोष्ट जेंव्हा मिळत नाही तेंव्हा ती मिळावी यासाठी विद्यार्थी अट्टाहास करतात मग त्यांना त्यात अप्याश आले की ते मृत्यूला कवटाळतात म्हणून पालकांनी मुलांना नकार पचवायला शिकवले पाहिजे. पालकांनी मुलांवर अपेक्षांचं ओझेही लादू नये.

विद्यार्थी आत्महत्या म्हणजे देशाची मोठी हानी त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याची जबाबदारी केवळ पालकांचीच आहे असे नाही तर शाळा, कॉलेज, शिक्षक, समाज आणि शासनाचीही आहे. या सर्व घटकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखणयासाठी प्रयत्न करायला हवेत.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर!

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने शिक्षण सर्वांसाठी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

--------------

शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

### विद्यार्थ्यांना मुदतवाढ

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

यानंतर न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या.

या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थांनी तक्रारी केल्या होत्या. याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

### तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५) :

पदवी (Under Graduate) : १७ हजार ७७८, पदव्युत्तर (Post Graduate) : १ हजार ९२७, डिप्लोमा (Diploma) : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये SEBC आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

### डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.

यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

### छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती सुरु करण्यात आली आहे.

सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची Ph.D. पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

### विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अधिछात्रवृत्ती :

JRF प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती UGC निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे.

तसेच SRF प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती (CSMNJRF) अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर (Award Letter) दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल, या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल (Dissertation) सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२० मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

### परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवगार्तील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी दर World Raking मध्ये २०० च्या आत रॅन्कीग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवगार्तील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio - GER) ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत.

महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

"शाहू - विचारांना देऊया गती साधुया सर्वांगीण प्रगती"

काशीबाई थोरात-धायगुडे
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय,
मुंबई.

# मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानिमित्त..!

भारतीय लोकशाहीत राजकारण म्हणजे समाजसेवेचं एक शस्त्र असावं, लोककल्याणाची एक दिशा असावी असं अपेक्षित होतं. पण आजच्या काळात ते एक प्रकारचं सत्तेचं दुकान बनलं आहे.

सत्ताधारी कुठलेही असोत त्यांच्यासमोर लोटांगण घालून, आपली विचारधारा विसरून, जनतेशी केलेली वचने पायदळी तुडवून, ह्यकोणत्याहीह्व गाडीत बसण्याची तयारी ठेवणारे दलबदलू नेते आपल्या राज्याच्या राजकीय वास्तवात दुर्दैवाने वाढतच आहेत.जनता फसते, निराश होते, पण पुन्हा-पुन्हा विश्वास ठेवते.

प्रत्येक निवडणुकीत तिला वाटतं की, कदाचित या वेळेस आपल्याला खरा नेता मिळेल. पण निवडणुकीनंतर दलबदलाची लगबग पाहून तीच जनता हादरून जाते.

पण ह्या सगळ्या गोंधळात, स्वार्थी व्यवहारात आणि तत्त्वहीन राजकारणाच्या

जमाव नाही तर तो लोकांच्या हृदयातून उगम पावलेला एक प्रवाह आहे.

### निवडणुकीतील समीकरणे आणि लोकांचा विश्वास

निवडणुकीच्या वेळी अनेक जणांनी जरांगे फॅक्टर चालला नाही, अशी चर्चा केली होती. कारण मतदारांनी आपल्या मनाप्रमाणे मतदान केलं. पण त्याच मतदारांच्या मनात जरांगे कायम राहिले.राजकारणात मतदार मनाला जपतो, आणि आंदोलनात हृदयाला. जरांगेंच्या आंदोलनाला जी जनसमर्थनाची लाट मिळाली आहे ती हेच दाखवते की, लोक हृदयातून अजूनही जरांगेंसोबत आहेत.

### मी फुटत नाही, मॅनेज होत नाही

जरांगेंनी दिलेलं एक वाक्य आज



झाले, कुणी उद्योगपती बनले. पण समाज मात्र मागेच राहिला. सत्तेत जाऊन समाजाचा प्रश्न सोडवण्याऐवजी बहुतेक नेत्यांनी आपली पिढी गब्बर बनवली.

म्हणूनच मराठा समाजाला हवा होता असा माणूस, जो विकला जाणार नाही, जो झुकणार नाही. तो माणूस म्हणजे मनोज पाटील जरांगे होय, हे नव्याने सांगण्याची गरज नाही.

### तत्त्वनिष्ठ नेतृत्वाची ताकद

जरांगेंच्या आंदोलनाला थांबवण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी कायदेपंडित आणले, पोलिसांचा वापर केला, दबाव टाकला. पण काहीही करून ते यशस्वी झाले नाहीत. कारण जरांगे यांच्या ओठात केवळ एकच भाषा आहे...मराठा लेकरांच्या उज्वल भविष्याची भाषा.

सगळ्यांना दिसते, लोक स्वतःहून आंदोलनाला येतात. राजकारण्यांना लोकांना आणावं लागतं, पैशाने जमवावं लागतं. पण जरांगेंच्या आंदोलनात लोक स्वतःच येतात. हाच त्यांचा विजय आहे.

### जरांगेंचं लोकांवरचं प्रेम

गावोगावी आज एकच वाक्य ऐकू येतं, पाटील जसं म्हणतील तसं. ही लोकांच्या मनातली निष्ठा आहे. महात्मा गांधींनंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर असा लोकसंग्रह महाराष्ट्राने पाहिला नव्हता.

पण आज मराठा समाज म्हणतो, मनोज पाटील जरांगे हेच आमचे तारणहार आहेत.

### दलबदलूंनी घ्यावा धडा

आज दलबदलू नेत्यांनी जरांगेंकडे डोळे उघडून पाहावं. कारण पैसा, पद, सत्ता यावर टिकणारी राजकारणाची दुनिया किती उथळ आहे, हे जरांगेंनी दाखवून दिलं.

त्यांचं नेतृत्व हे न विकलं जाणारं, न

# किरीट सोमय्या कोणत्या पदावर?

## काँग्रेस खासदारासह माजी मंत्र्यांचा खडा सवाल




■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २ :
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांचेही अमरावती हे आजोळ आहे. या ठिकाणी जर जातीय राजकारणाची प्रयोगशाळा केली जात असेल, तर ते योग्य नाही. किरीट सोमय्या हे कुठल्या पदावर आहेत. आजी-माजी खासदार अनेक जण असतात. पण, किरीट सोमय्या यांना प्रत्येक जिल्ह्यात जाऊन गोंधळ घालण्याचा अधिकार कुणी दिला, असा सवाल करीत काँग्रेसच्या नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर आणि खासदार बळवंत वानखडे यांनी सोमय्या यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

यशोमती ठाकूर म्हणाल्या, किरीट सोमय्या कोण आहेत. निवडणुका आल्या की यांना जाती-धर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचे उद्योग सुचतात. त्यांची नाटके आता अजिबात सहन केली जाणार नाहीत. किरीट सोमय्यांच्या माध्यमातून सरकार हे प्रशासनावर आणि पोलीस यंत्रणेवर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे बरोबर नाही. हे पूर्णपणे निषेधार्ह आहे.

या ठिकाणी एकही रोहिंग्या घुसखोर सापडलेला नाही, तरीही गोंधळ घालणे सुरू आहे. हे अमरावती जिल्ह्यातील जातीय सलोख्याच्या वातावरणासाठी हे चांगले नाही. महाराष्ट्रात, देशात सौहार्दाचे वातावरण टिकून राहिले पाहिजे. जाती-धर्मात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा यशोमती ठाकूर यांनी दिला. गेल्या दहा वर्षांपासून भाजपच सत्तेत आहे. देशात आणि राज्यात भाजपचीच सत्ता आहे. त्यांची यंत्रणा काय करीत आहे, असा सवाल यशोमती ठाकूर यांनी केला.

खासदार बळवंत वानखडे म्हणाले, किरीट सोमय्या हे वारंवार अमरावतीत येऊन प्रशासनावर दबाव टाकत आहेत. खोटे जन्मदाखले देण्यात आल्याचा आरोप करीत आहेत. रोहिंग्यांना मोठ्या प्रमाणावर दाखले दिले आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. पण, जिल्ह्यात एकही रोहिंग्या नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अमरावतीत जातीय सलोख्याचे वातावरण आहे. पण, शांतता बिघडविण्याचे काम किरीट सोमय्या हे करीत आहेत. खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी प्रशासनावर दबाव आणत आहेत.

या संपूर्ण गोंधळात प्रशासनाने सर्व धर्मीयांच्या मुलांचे जन्मदाखले वितरीत करणे थांबवले आहे. जन्म-मृत्यूच्या नोंदी वेळेवर होत नसल्याचे गंभीर प्रश्न निर्माण होणार आहेत. सर्वसामान्य नागरिकांची यामुळे प्रचंड अडचण होत असून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या संपूर्ण प्रकारासाठी किरीट सोमय्या यांचा अट्टाहास कारणीभूत आहे, अशी टीका बळवंत वानखडे यांनी केली.

# शेतकरी सक्षमीकरणासाठी बीडीसीसी कटीबद्ध

## अध्यक्ष सुनील फुंडे यांची मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा : शासनाकडून सहकार्य देण्याची फडणवीसांची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा / नागपूर, दि. २ :
भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन जिल्ह्यातील सहकारी चळवळीची सध्याची स्थिती व बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. या वेळी आमदार डॉ. परिणय फुके उपस्थित होते.



सुनील फुंडे यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वितरण, शेतमाल खरेदी-विक्री सुलभता, ठिबक सिंचन व पाणलोट प्रकल्पांसाठी आर्थिक सहाय्य, तसेच शैक्षणिक कर्ज योजना याबाबत बँकेने केलेले कामकाज मुख्यमंत्र्यांसमोर मांडले.

त्यांनी स्पष्ट केले की, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी मोठे योगदान दिले असून बँकेच्या योजनांचा लाभ हजारो शेतकरी कुटुंबांना झाला आहे.

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काही नवीन उपाययोजना राबवण्याची मागणी सुनील फुंडे यांनी मुख्यमंत्र्यांना केली. यामध्ये शेतकरी समूह कर्ज योजना, महिला बचत गटांना विशेष भांडवल पुरवठा, ग्रामीण भागात डिजिटल बँकिंग सेवा, तसेच शेतमाल प्रक्रिया उद्योगांना आर्थिक प्रोत्साहन यांचा समावेश आहे. त्यांनी सांगितले की या योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे केवळ कर्जभार कमी होणार नाही, तर रोजगार निर्मितीच्या संधीही उपलब्ध होतील.

या प्रसंगी आमदार डॉ. परिणय फुके यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या, कर्जबाजारीपणा, उत्पादन खर्च व बाजारपेठेतील अडचणी यावर प्रकाश टाकत शासन स्तरावर अधिक प्रभावी योजनांची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची विनंती फडणवीस यांच्याकडे केली.

मुख्यमंत्र्यांनी सुनील फुंडे यांचे कौतुक करत राज्य शासन जिल्हा सहकारी बँकेला आवश्यक ते सहकार्य करेल असे आश्वासन दिले. त्यांनी शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण, कृषीपुरक व्यवसायांना चालना, कर्जमाफी आणि ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सकारात्मक धोरणे राबवण्याचे आश्वासन दिले. भंडारा जिल्ह्यातील प्रगतीचे नवे मार्ग खुल्या होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भरधाव रुग्णवाहिकेच्या धडकेत युवकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. २ :
अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध येथे भरधाव रुग्णवाहिकेने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीवर बसलेला एक युवक ठार झाल्याची घटना देवलगाव शिवारात घडली.

तारेश मनोहर सांगोळकर (वय २५) रा. नवेगावबांध असे अपघातात ठार झालेल्या युवकाचे तर अनिल पुरुषोत्तम मेश्राम असे जखमी युवकाचे नाव आहे.

तारेश व अनिल हे दोघेही मित्र दुचाकीने बाहेर जाण्यासाठी निघाले होते. दरम्यान ते देवलगाव येथील रस्त्याच्या कडेला गाडी उभी करून उभे होते. याच दरम्यान भरधाव रुग्णवाहिकेने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.धडक एवढी जोरदार होते रुग्णवाहिकेने दुचाकीला जवळपास १०० मीटर फरफटत नेले. यात तारेशचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर अनिल गंभीर जखमी झाला. दुचाकीला धडक दिल्यानंतर रुग्णवाहिका चालक रुग्णवाहिकेसह घटना स्थळावरून पसार झाला.

रस्त्यावर असलेल्या नागरिकांनी जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल केले. तसेच या घटनेची माहिती नवेगावबांध पोलिस स्टेशनला दिली. पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि रुग्णवाहिकेचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू केली.

# खाण परिसरात खचला मातीचा मोठा ढिगारा

## मातीत दबली दोन वाहने : चार युवक बचावले





■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २ :
घुग्घुस परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे वेकोलीच्या वणी क्षेत्रातील निलजाई खाण परिसरात अपघात झाला. उकनीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेला ढिगारा अचानक कोसळला. मातीचा मलबा वेगाने रस्त्यावर आला. त्यामुळे एक स्कॉर्पियो आणि १८ चाकांचा ट्रक पूर्णपणे मातीत गाडला गेला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून हश्ये सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाली आहेत.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, स्कॉर्पियोमध्ये चार युवक प्रवास करीत होते. ते कसाबसे गाडीच्या मागच्या दरवाजातून बाहेर पडले आणि जीव वाचवला. हे सर्व युवक उकनी गावातील रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र गाडी पूर्णपणे मातीखाली दबली गेली.

त्याचप्रमाणे, मलब्यात अडकलेला १८ चाकांचा ट्रक वंदना ट्रान्सपोर्टचा आहे. अपघातानंतर निलजाई-घुग्घुस मार्ग पूर्णपणे बंद करण्यात आला. दुसऱ्या पाळीतील खदान कर्मचाऱ्यांना व्यवस्थापनाने पर्यायी मार्गाने बसमधून घरी पाठवले. सध्या रस्त्यावरून वाहतूक ठप्प आहे.

वेकोलि व्यवस्थापनाने तत्काळ मलबा हटवण्याचे काम सुरू केले आहे. जड यंत्रसामग्रीच्या साहाय्याने मातीचा डोंगर हटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मात्र सततच्या पावसामुळे कामात अडचणी येत आहेत. अधिकारी लवकरात लवकर मार्ग सुरू करण्याचे प्रयत्न करीत आहे,असे असल्याचे सांगण्यात आले. पावसाळ्यात खाण परिसरात सुरक्षा आवश्यक आहेत. सुदैवाने स्कॉर्पियोतील युवक वेळेत बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली.

# महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता : विदर्भाला अलर्ट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :
महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीसाठी जोरदार पावसाचा 'अलर्ट' जारी केला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात सध्या चक्रवाताची स्थिती सक्रिय आहे. पुढील २४ तासांत हे वारे वायव्य दिशेला सरकून, वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, मध्य महाराष्ट्र, कोकण, गोवा किनारपट्टीसह मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. गेल्या महिन्यापासून महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढलेला असून, सप्टेंबरच्या सुरुवातीलाही तो कायम राहणार आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, समुद्राच्या तळाशी मान्सूनच्या द्रोणीय परिस्थितीमुळे कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे, तर राजस्थानच्या मध्य भागात चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. याचा परिणाम म्हणून देशाच्या विविध भागांत जोरदार पाऊस पडेल.

येत्या सात दिवसांत गुजरातसह महाराष्ट्रातील कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. ३, ४



आणि ५ सप्टेंबर रोजी कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात विशेषतः विदर्भात अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग रत्नागिरी रायगड तसेच पुणे सातारा कोल्हापूर घाटमाथ्यावर हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला आहे. विदर्भातील चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यालाही ऑरेंज अलर्ट आहे. मुंबई, ठाणे, पालघर ,नाशिक, नगर, पुणे, बीड, परभणी, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर, संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला असून, उत्तर महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातही तुफान पावसाची शक्यता आहे.

: मुलखावेगळी माणसं :

# कमळवेडा माणूस

निसर्गात रमणारी माणसं ध्येयवेडी असतात. राष्ट्रीय फुल कमळ हे सवार्नाच मोहून टाकणारे आहे. मात्र, या फुलावर जीवापाड प्रेम करणाऱ्या कमळमॅनची कथा देखील तितकीच अनोखी आहे.

या कमळ मॅनचा जन्म लोणावळा येथे झाला. आई वडिलांच्या अकाली निधनानंतर याचे संगोपन आजोळी आजीआजोबांच्या कडेच झालं. शारीरिक व्यंगावर मात करून आपल्या छंदालाच व्यावसायिक स्वरूप देऊन तेच आपल्या उपजीविकेचं साधन बनविणारा हा अवलिया म्हणजेच चिंचवड मध्ये राहणार सतीश गाडिया. याचा छंद कोणता तर कमळ फुलांच्या विविध प्रजातींच्या कमळ बागेचा.

सतीशचे बालपण चिंचवड मध्ये आपल्या आजोळी गेले. त्याची आजी सुंदराबाई बागमार हिला निसर्ग,फुलझाडं आणि बागकामाची खूप आवड होती. देवपूजेसाठी तिला विविध फुल लागायची. त्यासाठी सतीश आपल्या आजीसाठी तासंतास भटकून कमळफुलं आणून द्यायची.

पुढे मोठे झाल्यानंतर सतीशने पोटापाण्यासाठी लौंड्रीचा व्यवसाय सुरु केला खरा, परंतु कमळ फुलांचे वेड काही डोक्यातून जात नव्हते. लौंड्रीच्या कपड्यापेक्षा सतीश फुलांमध्येच जास्त रमत. लौंड्रीचे कपडे गोळा करण्यासाठी एके दिवशी एका ग्राहकाच्या अंगणात असलेल्या कमळफुलाने तयन आकर्षित केले. त्यामुळे कमळप्रेमी असलेल्या सतीशच्या मनातील कमळ फुलांच्या आवडीने पुन्हा उचल खाल्ली.



लोकमानस

त्या ग्राहकाकडून एक कमळ घेऊन सतीशने आपल्या घरातील एका भांड्यात पाणी टाकून ते लावलं. प्रथमवर्षी त्याला एकही कंद आला नाही. परंतु ते निराश झाले नाहीत. परंतु मग कमळ वेड्या सतीशजींनी कमळावर आधारित अनेक पुस्तकांचा अभ्यास केला या दरम्यान अचानक एके दिवशी या कमळाला टपोरी कळी फुलली. मग तर सतीशचं कमळप्रेम आणखीच फुल्ल. पाहता पाहता हे रोप छोट्या भान्ड्यातून तबकात, नंतर मग मोठ्या लोखण्डी टबात ते कमळरोप विसावलं. आता सतीशजींची अडचण झाली ती जागेची. त्यांचं घर छोट होत मग त्यांनी आपल्या घराच्या छपरावर आपली कमळबाग फुलवायला सुरवात केली.

दरम्यानच्या काळात आपल्या कमळ छंदाविषयीची सर्व शास्त्रीय माहिती त्यांनी जाणून घेतली आणि त्यानंतर कमळाच्या विविध जातींची जोपासना त्यांनी सुरु केली. त्यांचे हे कमळ वेड पाहून त्यांच्या सासऱ्यांनी त्यांना आळंदी जवळ त्यांना डुडुळ गावात एक एकर जमीन दिली. या जमिनीवर सतीश यांनी १० बाय १० चे हौद निर्माण केले अशा प्रकारे पत्र्यावरची कमळ बाग हि शिवारात पोहचली.

आज त्यांची फुललेली कमळबाग बघायला अनेक हौशी लोक येतात तसेच आयुवेर्दाचा अभ्यास करणारे डॉक्टर देखील येतात त्यांना आयुर्वेदच्या दृष्टीने कमळाचं महत्व सतीश लोकांना पटवून सांगतात. त्याच बरोबर कमळाच्या पाककृती,कमळाचे औषधी गुणधर्म, कमळाचे धार्मिक महत्व अशा प्रकारची माहिती ते लोकांना देतात. एकूणच,या छंदामुळे सतीश गोदीया यांची कमळ मॅन अशीच जी ओळख मागील काही वर्षात निर्माण झालेली आहे ती अगदी योग्यच आहे.

■ ■ ■

## ४ - मिती धोरणावर लक्ष केंद्रित करून रेमेडियम लाईफकेअर चार्ट्स ४ वाढीचा मार्ग

औषध पुरवठा साखळी आणि विशेष रसायन क्षेत्रातील वेगाने वाढणारी कंपनी, रेमेडियम लाईफकेअर लिमिटेडने ४-मिती धोरणावर आधारित एक रणनीतिक रोडमॅप यशस्वीरित्या अनावरण केला आहे.

पहिला स्तंभ प्रगत उत्पादन आहे, जो विद्यमान सीडीएमओ (कॉन्ट्रॅक्ट डेव्हलपमेंट अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑर्गनायझेशन) सुविधांचे अपग्रेडिंग आणि वाढत्या जागतिक मागणीला पूर्ण करण्यासाठी क्षमता वाढविण्यावर केंद्रित आहे. हे एकात्मता उपक्रम खर्चात आणखी ऑप्टिमाइझ करतील आणि उच्च नफा सुनिश्चित करतील.

REMEDIUM LIFECARE

दुसरा स्तंभ म्हणजे जागतिक निर्यात विस्तार, ज्यामध्ये नवीन भौगोलिक क्षेत्रात प्रवेश करून आणि विद्यमान बाजारपेठांमध्ये त्याची उपस्थिती वाढवून आंतरराष्ट्रीय पाऊल ठसा मजबूत करण्याच्या योजना आहेत.वाढलेली पुरवठा साखळी क्षमता आणि कार्यरत भांडवल तैनाती अखंड जागतिक ऑपरेशन्सना समर्थन देईल.

तिसरा स्तंभ म्हणजे नवोन्मेष आणि संशोधन आणि विकास उत्कृष्टता, ज्याला एक समर्पित गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेची स्थापना आणि संसर्गविरोधी, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आणि मध्यवर्ती मज्जासंस्था उपचारांसारख्या उपचारात्मक क्षेत्रांमध्ये व्यापक संशोधनाद्वारे समर्थित केले जाते. हे उत्पादन विकासाला गती देईल, नियामक अनुपालन सुनिश्चित करेल आणि कंपनीच्या नवोन्मेष पाइपलाइनला बळकटी देईल.

चौथा स्तंभ म्हणजे उत्पादन विविधीकरण, ज्याचा उद्देश कंपनीच्या विशेष रसायन आणि औषधनिर्माण पोर्टफोलिओचा विस्तार करणे आणि बाजारपेठेच्या बदलत्या गरजा पूर्ण करणे, क्षेत्रीय चढ उतारांविरुद्ध लवचिकता सुनिश्चित करणे आणि महसूल प्रवाहांचा विस्तार करणे आहे. रेमेडियम लाईफकेअर लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आदर्श मुंजाल म्हणाले, ही तिमाही रेमेडियम लाईफकेअर लिमिटेडसाठी एक टर्निंग पॉइंट आहे. आमच्या संपूर्ण आर्थिक वर्ष २०२५ च्या नफ्यापेक्षा जास्त PAT देणे हे आमच्या व्यवसाय मॉडेलची ताकद आणि ऑपरेशनल चपळता दर्शवते.

यशस्वी राईट्स इश्यू आणि आमची केंद्रित ४-बिंदू धोरण-चालवणारी उत्पादन उत्कृष्टता, जागतिक निर्यातीला गती देणे, संशोधन आणि विकास नवोपक्रम वाढवणे आणि उत्पादन विविधीकरणाचा विस्तार करणे आम्हाला ४ पट वाढ साध्य करण्यासाठी आणि आमच्या भागधारकांसाठी शाश्वत मूल्य निर्माण करण्यासाठी एक शक्तिशाली पाया प्रदान करते.

■ ■ ■

## मराठा आरक्षण आंदोलन यशस्वी होईल का?

**मीनल देशमुख, सामाजिक कार्यकर्ती**
मागील चार दिवसापासून मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरंगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाचे हक्काच्या आरक्षणासाठी आंदोलन सुरु आहे जे मागील अनेक वर्षांपासून सुरु आहे. अर्थात इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा बांधवाना सरकार आरक्षण देऊ शकते आणि तेही घटनेच्या तरतुदीनुसारच. मराठा समाज हा मूलतः कुणबी आहे आणि कुणबी म्हणून या समाजाला नक्कीच आरक्षण देऊन हा लढा यशश्वी होऊ शकतो.

**विद्याधर साळवी, शिक्षक**
आर्थिक दृष्टिकोनाचे निकष जर मराठा समाजाला लावले तर हा समाज इतर मागास समजाप्रमाणेच आर्थिक दुर्बल आहे म्हणूनच मराठा समाजाला त्यांच्या हककचे आरक्षण सरकारने द्यायलाच हवे. मुंबईतील जरांगे पाटील यांनी सुरु केलेला आंदोलनाचा हा लढा म्हणजे फक्त भावनात्मक नाही तर मराठा समाजाच्या भावी पिढीच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेचा लढा आहे. म्हणूनच मनोजदादा प्राणप्रणाणे लढत आहेत आणि महाराष्ट्रातील तमाम मराठ्यांची फौज हा लढा यशश्वी करणारच.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## तलाव फुटला; पिके पाण्याखाली

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २ :
धारणी ते अकोट रस्त्यावर असलेल्या बारू गावातील तलाव आज सकाळी फुटला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरले आणि शेकडो हेक्टरवरील पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली, या धक्कादायक घटनेने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. प्रशासन स्थितीकडे लक्ष ठेवून आहे.

# विदर्भाच्या अष्टविनायकांपैकी एक केळझरचा सिध्दिविनायक








**केळझरस्थित वरदविनायक**
श्री गणपतीची मूर्ती चार फूट सहा इंच उंच असून व्यास १४ फूट आहे. १९९३ ला या मंदिरात जीर्णोद्धाराच्या कामास सुरुवात झाली. १९९४ मध्ये महाशिवरात्रीच्या अगोदर खोदकामात शिवलिंग मिळाले. याविषयी शिवलीला अमृताच्या अखेरच्या अध्यायात एकचक्रानगरात ज्योर्तिलिंग असल्याची नोंद आहे. याच गावात जैन पंथाचे आठवे तीर्थंकर चंद्रप्रभू स्वामींची सुरेख मूर्ती मिळाली. ती आठव्या शतकातील असावी , अनन्यसाधारण आहे.

■ संजय धोगंडे, सेलू / वर्धा, दि. २ :
विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केळझरचा सिध्दिविनायक गणपती प्रसिद्ध आहे. गणेश उत्सवात येथील मंदिरात दहा दिवस या गणेशाचे दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळते

जिल्ह्यात केळझर येथे हे पुरातन श्री गणपती मंदिर असून विदर्भाच्या अष्टविनायकांपैकी एक आहे विदर्भात सर्वदूर याची ख्याती आहे. केळझर हे ठिकाण मुख्य महामार्गावर नागपूरवरून ५२ किलोमीटर तर वर्धेवरुन २६ किलोमीटर अंतरावर आहे टेकडीच्या कुशीत बसलेले मंदिर मुख्य मार्गावर अंदाजे एक फर्लांग अंतरावर उत्तरेकडे उंच टेकडीवर बसलेले आहे.

मंदिराकडे जाणारा रस्ता गावातून असून रस्तादर्शक फलक मुख्य मार्गावरच लावण्यात आलेला आहे. वशिष्ठ पुराणाप्रमाणे या स्थळाला ऐतिहासिक महत्व असून या गावाचे नाव एकचक्रानगरी असल्याचा वशिष्ठ पुराण आणि महाभारतात उल्लेख आढळतो.

वशिष्ठ पुराणाप्रमाणे श्रीरामचंद्र प्रभूचे गुरु श्री वैशिष्ठ ऋषी यांचे वास्तव्य येथे असल्याची नोंद असून वशिष्ठ ऋषींनी स्वतःच्या भक्ती व पूजेकरिता या गणपतीची स्थापना केल्याचा उल्लेख आहे. त्यानंतर त्याच काळात वर्धा नदीच्या निर्मितीचा उल्लेख आहे.

पुराणाप्रमाणे या गणपतीचे नाव 'वरदविनायक' असून वर्धा नदीचे 'वरदा' असे नाव आहे. हा काळ श्रीरामजन्माच्या पूर्वीचा असून रामजन्मानंतर श्री वशिष्ठ रुषींनी येथील वास्तव्य सोडले. या गावात कुंतीपुत्र पांडव एकचक्रनगरात वास्तव्याला असताना बकासूर नावाच्या राक्षसाला मारल्याचा उल्लेख महाभारतामध्ये असून ते ठिकाण वर्धा नागपूर मुख्य मार्गावर गावाच्या आग्नेय बाजूला बकासुर, तोंड्या राक्षसाचे मैदान म्हणून प्रचलित आहे.

याच टेकडीवर श्री गणपतीचे मंदिर आहे. टेकडी निसर्गरम्य असून वाकाटकाच्या काळापासून एक भव्य किल्ल्याचे ठिकाण होते. त्या किल्ल्याला पाच बुरुज होते. तीन माती-दगडांनी बांधलेले भव्य परकोट होते. पहिल्या आणि दुसऱ्या परकोटाच्या आत चौकोनी सुंदर व भव्य अशी विहीर असून त्याला 'गणेशकुंड' या नावाने ओळखले जाते.

असंख्य भाविक त्याचा तीर्थ म्हणूनही वापर करतात. वाकाटकानंतर प्रवर्शन राजाचे हे गांव मुख्यालय असल्याची इतिहासात नोंद आहे, भोसलेराजे, कोल्हापूरवरून नागपूरला स्थलांतरित होण्यापूर्वी त्यांचा केळझरला मुक्काम झाल्याची नोंद आहे.

गणेश उत्सवानिमित्त दहा दिवस मंदिरात रोशनाई केल्या जाते. रोशनाईने मंदिर परिसर अनेकांचे लक्ष वेधून घेणारा ठरला आहे . गणेश उत्सवात टाळ, विणा, भागवत, भजन कीर्तन आदी कार्यक्रमाचे आयोजन केले गेले आहे . पहाटे पुजारी राममुरात मिश्रा श्रींची आंघोळ घालून पूजा अर्चा करुन मंगेश शंकर धरमुळ यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.

अनंत चतुर्दशीला महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार असून भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष माधव ईरूटकर, सचिव सुभाष तेलरांधे ,महादेव कापसे, गजानन नरड, रामचंद्र इंगोले, महेंद्र घवघवे, अनिल तेलरांधे, किशोर महाजन, अमोल जोगे यांच्यासह समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.